**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :३०/५/२०१७

प्रति,
मा. ----------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र - २ शनिवार दि.०३/०६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**शनिवार दिनांक- ०३/०६/२०१७ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ९ | मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या दिनांक १५/१/२००८ अधिसुचनेव्दारे नागापुर एम.आय.डी.सी.ब्लॉक हा भाग सर्व्हे नंबर ९ ते २१ हद्दीतुन वगळयामुळे बील क्र.१ ते २३१ कर आकारणी बीले रद्द करणे व मागील थकबाकी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | अर्जदार श्री. झिने संदीप मोहनलाल , रा. गुलमोहर रोड सावेडी,अ.नगर वॉर्ड क्र.५२, बील नं.६९८ चे सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ अखेर मोबाईल टॉवरची करण्यात आलेली कर आकारणी शास्तीसह रक्कम कायमस्वरूपी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १४ | ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १५ | ई  निविदा क्र.१४८३ मधील **ए)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कमेतुन रस्त्याचे पॅचिंग करणे **बी)**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे **सी)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील शहर व उपनगरभागातील रस्त्याचे पॅचिंग करणे  बाबत चा ऑफिस रिपोर्ट. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन व स्टाफ नर्स यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिनयाकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट . |
| १७ | अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द  पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट |

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- ९ सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नागापुर विभाग,प्रभाग समिती क्र.१

विनंतीपुर्वक रिपोर्ट वसुली लिपीक वॉर्ड क्र.७२ अ यांचकडून देण्यात येतो की,अर्जदार श्री जितेंद्र कचरदास मुनोत रा.नागापुर यांनी वॉर्ड नं.७२अ बिल नं ३७२ चे बील माझे नसुन सदरची घरपट्टीची जागा व बील महानगरपालिकेचे असुन सदरच्या बीलावरिल जागा व बील महानगरपालिकेचे असून सदरच्या बीलावरिल अतिरीक्त मालमत्ताधारक भोग :- जितेंद्र कचरदास मुनोत हे नांब कमी करून बिल रद्द करणेबाबत इकडील कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्याकरीता अर्ज अर्जदार यांच्या अर्जानुसार परिशिष्ट अ नक्कम पाहिली असता पितळे कॉलनी नागापुर येथील ओपन स्पेसमध्ये अंगणवाडी शेजारी अ.नगर नगरपारिषद भोग जितेंद्र कचरदास मुनोत यांचे दर्शना सप्लायर्स नावाने पत्र्याचे २६.८८ चौ.मी.सिमेंट गोडावून आहे.

त्याकरीता अर्जदार यांच्या अर्जानुसार मिळकतीचे समक्ष स्थळ पहाणी केली असता सदर ठिकाणी असलेले पुर्वीचे पत्र्याचे बांधकाम संपुर्णपणे पाडून जमिनदोस्त आढळून आलेले असल्यामुळे बिल क्र.३७६ वर घरपट्टी आकारणी केलेली रक्कम मार्च २०१६/२०१७ अखेर (मे) अखेर रूपये १३,८९९/- रद्द करणेबाबत मान्यतेस्तव तसेच मंजुरीनुसार संगणक विभाग,रिव्हिजन रजि.परिशिष्ट अ फॉर्म वर बिल दुरूस्ती नोंद घेण्यास अहवाल मंजूरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, सदर वसुली लिपीक यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार वॉर्ड नं.७२ अ बिल नं.३७६ श्री.जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे घरपट्टीचे बील होते.समक्ष पहाणी केली असता सदरची मालमत्ता संपुर्ण जमिनदोस्त केलेली आहे.तरी सदरचे बिल रद्द करावे किंवा कसे याबाबत सदरचा रिपोर्ट सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर सहाय्यक कर निरीक्षक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,या संदर्भात मनपा विधीतज्ञांचे मार्गदर्शन घेवून फेरसादर करा.

यावर ॲडव्होकेट धैर्यशील लक्ष्मण वाडेकर यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांच्या अहवालानुसार जागा जमीनदोस्त झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येते,सदर जागेचा मालमत्ताकर निर्लेखित करण्याचे अधिकार मा.स्थायी समितीला असल्यामुळे सदर मा.स्थायी समितीकडे सदर प्रस्ताव व मा.स्थायी समितीकडे सादर करणे उचित राहील.

यावर वसुली लिपीक यांचा अभिप्राय की, प्रस्तुत प्रकरणात सदर ओपनस्पेस गोडावून हे अहमदनगर महानगरपालिच्या ओपन स्पेस जागेत होते.ते संपूर्ण पाडण्यात आलेले असून सदर जागा रिकामी आहे.सदरच्या मिळकतीची कर आकारणी चालु आहे.सदरच्या बांधकामावरील कराची रक्कम वसुन न होण्याजोगी असल्याने सदर प्रकरण हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार बिलाची रक्कम रू.१४,१९५/- इतकी निर्लेखित करणेविषयी आदेशार्थ सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, सदर प्रस्तावानुसार सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणात मनपाच्या ओपन स्पेसला कराची आकारणी झालेली आहे.ती आकारणी करणे चुकीचे आहे.तथापी ती कमी करून शास्तीसह सदर रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार निर्लेखित करण्यास हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार प्रस्तावित रक्कम निर्लेखित प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या संचिकेमधिल टिपणी मध्ये नमुद अ प्रमाणे स्थळ पहाणी अहवाल समाविष्ठ नाही.तरी पुर्ततेसह फेरसादर करावे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,सदर मिळकतीची समक्ष स्थळ पाहणी करण्यात येवून समक्ष स्थळ पाहणी अहवाल सोबत जोडला आहे.पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त फेरसादर अहवालानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपयुक्त (कर संकलन) यांनी कायदेशीर तरतुदी पाहीन तपासून खातरजमा करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह फेरसादर करावे.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर करण्यात येते की,सदर मालमत्ता महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मध्ये गोडावून म्हणून होती.सन २००१ च्या रिव्हीजन मध्ये त्यावर आकारणी करण्यात आली.सदर गोडावून मालमत्ता धारकाने पाडून जमीनदोस्त केली आहे असे प्रस्तावात नमुद आहे.मनपाच्या विधीतज्ञांचा अहवाल सुध्दा घेण्यात आला असून सदर थकबाकी वसूल न होणारी आसल्याने कलम १५२ नुसार निर्लेखित करण्यासाठी मा.स्थायी समितीकडे मान्यतेस पाठविणे उचित सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.उपयुक्त यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त व मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आजच सभेमध्ये मा.सौ.छाया सुरेश तिवारी,नगरसेविका यांनी अर्ज दिला आहे की,प्रभाग क्र.१४ मध्ये म्युनिसिपल कॉलनी वसाहत येथील महानगरपालिकेच्या सफाई कर्मचा-यांना १९७६ मध्ये दिली आहेत.सदरची घरे हि त्यांच्या मालकी हक्काची असून येथे ६ खोल्यांची एक चाळ या प्रमाणे बांधकाम केले असून प्रत्येक चाळीच्या पहिल्या व शेवटच्या खोल्यांना त्यांचे दोन चाळींच्या मध्ये

असणारी खुली जागा संबंधीत खोली मालक यांचे शेजारील भिंती शेजारीच असल्याने इतर कोणासही या जागेचा उपयोग होत नाही.पुर्वी सदर जागेमध्ये पाटीचे (डब्याचे संडास )होते.सदर संडास आता बंद झाल्याने ही जागा रिकामी झालेली आहे.ही जागा दोन चाळी मधील गेलेला रस्ता सोडून जागा असल्याने सदर जागेमुळे रस्त्यास कोणतीही बाधा येत नाही.सध्या जागा मालकाच्या कब्जात असल्याने या जागेचा वापर जागा मालक करीत आहे.सदरची जागा योग्य ते चालु रेडीरेकनर दरा नुसार शुल्क आकारून महानगरपालिकेने खरेदी करून देणे बाबत अर्ज केला आहे.त्या नुसार सदर खरेदी महानगरपालिकेने जागेचे चालु रेडीरेकनर दरा नुसार मृल्य काढून संबंधीत जागा मालकांना खरेदी देण्याची कार्यवाही करावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नगररचनाकार विभाग यांनी हे पत्र वाचून आपला अभिप्राय दयावा.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- सदर वसाहत ही महानगरपालिकेची असून पत्रामध्ये नमुद जागा ही आपल्या ताब्यात नाही. दोन चाळींच्या मध्ये असणारी खुली जागा संबंधीत खोली मालक यांचे ताब्यात आहे.हा रहदारीचा रस्ता नसल्याने सदरची जागा चालु रेडीरेकनर दरा नुसार जागेचे मृल्य काढून महानगरपालिकेने खरेदी देण्याबाबत समितीने निर्णय घ्यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात येत आहे.तसेच म्युनिसिपल कॉलनी,सिध्दार्थनगर येथील ही महानगरपालीकेच्या कर्मचा-याची वसाहत तत्कालीन नगरपालिकेने सफाई कर्मचा-यांकरीता घरे बांधून दिली असून १९७६ साली या कर्मचा-यांना मालकी हक्काने दिली आहे.या घरांशेजारील जागा आपल्या ताब्यात नाही,या बाबत अदयाप कोणाची तक्रार नाही.त्यामुळे त्यांचे मागणीनुसार पुर्व पश्चीम व दक्षिण उत्तर ७ फुट रूंदी x २८फुट लांबी मोजमापाची जागा चालु रेडीरेकनर दरा नुसार मृल्य काढून संबंधीत जागा मालकांना खरेदी देण्याची कार्यवाही करावी. महानगरपालिकेने खरेदी देण्याची कार्यवाही करावी. महानगरपालिकेस यापासुन उत्पन्न मिळेल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- किती घरांचा विषय आहे ,

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- अर्जा मध्ये ७ जागा मालकांची मागणी आहे.

सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास हि सभा मान्यता देत आहे.सभेमध्ये दिलेल्या मा.नगरसेविका सौ.छाया सुरेश तिवारी यांचे अर्जा नुसार पुर्व पश्चीम व दक्षिण उत्तर ७ फुट रूंदी x २८फुट लांबी मोजमापाची जागा यो योग्य ते शुल्क आकारून, जागेचे मृल्य काढून महानगरपालिकेने खरेदी देण्याची कार्यवाही करावी.या नुसार म्युनिसिपल कॉलनी वसाहत, सिध्दार्थ नगर येथील इतर जागा मालाकांनी जागा खरेदी बाबत मागणी केल्यास खरेदी देण्याची कार्यवाही करावी.

**ठराव : -**ऑफिस रिपोर्ट नुसार मालमत्ताधारक जितेंद्र कचरदास मुनोत यांचे नांवे असलेली वॉर्ड क्र.७२ अ बील क्र.३७६ अतिक्रमण जागेवर झालेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास हि सभा मान्यता देत आहे.तसेच शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

सभेमध्ये दिलेल्या मा.नगरसेविका सौ.छाया सुरेश तिवारी यांच्या यादी नुसार व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार १. प्रसेन भगवान कुरापटी २.अविनाश अजित चव्हाण ३.महेश व हरिष गिरीधारीलाल मध्यान ४.हलीमा मुनीर चव्हाण ५.प्रकाश महादेव पावसे ६.वसंत शंकर थोरात ७.रामचंद्र पुंजाजी ढवळे यांना पुर्व पश्चीम व दक्षिण उत्तर ७ फुट रूंदी x २८फुट लांबी मोजमापाची जागा महानगरपालिकेने चालु रेडीरेकनर दरा नुसार मृल्य काढून संबंधीत जागा मालकांना जागा खरेदी देण्याची कार्यवाही करावी. सदरचे क्षेत्र हे मुळ क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.या ठरावा नुसार म्युनिसिपल कॉलनी वसाहत, सिध्दार्थ नगर येथील इतर जागा मालाकांनी जागा खरेदी बाबत मागणी केल्यास खरेदी देण्याची कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १० सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालका बुरूडगांव रोड, प्रभाग समिती क्र.४

वॉर्ड क्र.२५ लिपिक यांज कडून रिपोर्ट देण्यात येतो की,ग.भा.छबुताई विश्वनाथ ठोंबे रा.आंबेडकर उदयान समोर कायनेटिक चौक अ.नगर यांनी दि.२/२/१५ रोजी अर्ज देवून वॉर्ड क्र.२५ बिल नं१९८ वरील नळ नसतांना लागलेली पाणपट्टी कमी करून पुढील बिलात समाविष्ट करून मिळावी असे इकडेस अर्ज दूवून कळविले आहे.

वरील अर्जप्रमाणे वॉर्ड क्र.२५ बिल नं१९८ गं.भां छबुताई विश्वनाथ ठोंबे रा.अंबेडकर उदयान समोर कायनेटिक चौक अ.नगर यांचा मालमत्तेचे पउणी पुरवठा फिटर यांचे मार्फ तपासणी केली असता सदर वरिल मालमत्तेत नळ नसलेबाबत फिटर ने रिपोर्ट दिल्या नुसार सदर मालमत्ताधारक यांनी सन २०१५ पर्यत संपूर्ण थकबाकी पाणीपट्टी सह भरलेली असून भरण्यात आलेल्या रक्कमेपैकी सन २०१५ पर्यत रू.११,५१३/-इतकी रक्कम निंलेखीत करून पुढील वर्षात पाणपट्टी बिलात कमी करून बिल अदा करणेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक व प्रभाग अधिकारी यांच्या स्वाक्षरी आहे.

यावर सहास्ब्यक मृल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार व म्यु.फिटर यांचे दि.१०/२/१५ चे पाहणी अहवालानुसार सदर मालमत्तेस नळ कनेक्शन नाही.मालमत्ता धारकाने सन २०१५ अखेर रू.११,५१३/-पाणीपट्टी दर्शविण्यात आलेली आहे.मुंबई प्रांतीक मनपा अधि.१९४९चे कलम १५१ नुसार निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल व मालमत्ता धारकाने पाणीपट्टी भरलेली रक्कम समायोजित पुढील आर्थिक वर्षात करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, सहाय्यक मुल्यनिर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्रायानुसार अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय कि,विभागाने प्रस्तावित केलेनुसार नमुद रक्कम निर्लेखित करून घेणेसाठी प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर सादर करणे उचित आहे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- यांची घरपट्टीची रक्कम भरलेली आहे का?

प्रभाग अधिकारी श्री.गोसावी :- संपूर्ण रक्कम भरलेली आहे.

मा.सभापती साहेब :- नळ नसल्याबाबत आपण खात्री केली आहे का?

प्रभाग अधिकारी श्री.गोसावी :- या बाबतचा पहाणी अहवाल असून मी खात्री केली आहे.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये मोहित मंजित मदान यांनी विनंती अर्ज देवून प्रेमदान चौकातील नोबेल हॉस्पीटल समोरील रस्त्यावरील मोकळी जागा व गजेंद्र प्रकाश सैंदर यांनी जुना दाणेडबरा ते ग्राहक भांडार परिसरातील रिकामी जागा पार्कीग व्यवसाया कारीता व प्रमोद आनंदा ठुबे यांनी अर्ज देवून केडगांव,अंबीकानगर बस स्टॉप जवळील जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नोबल हॉस्पीटल हे शहरातील नामांकीत हॉस्पीटल असून या ठिकाणी शहर व बाहेरगांवच्या रूग्णांची मोठया प्रमाणात गर्दी असते जुना दाणे डबरा ते ग्राहक भांडार येथे बाजार पेठ असल्यानं ठिकाणी वाहन चोरीचे प्रमाण जास्त असल्याने महानगरपालिकेमार्फत पे ॲण्ड पार्किंगची व्यवस्था केल्यास नागरीक रस्त्यांवर अस्तव्यस्त वाहने लावणार नाहीत.वाहन चोरीला आळा बसेल.पे ॲण्ड पार्कीग पासुन महानगरपलिकेला चांगल्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.अर्जदारास मागणी नुसार अटी व शर्ती नुसार पार्कीग व्यावसाया करीता जागा भाडेतत्वावर देण्यात यावी.व अर्जदार श्री.प्रमोद आनंदा ठुबे यांना अंबिकानगर बस स्टॉप जवळ,बालाजी कॉम्प्लेक्य शेजारी १०x१५ चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर देणे करीता अटी व शर्ती नुसारनियमा नुसार देण्यात यावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करण्यात यावी.तसेच वरिल अर्जदार यांचे मागणी नुसार पे ॲण्ड पार्किग करीता जागा भाडेतत्वावर देणे करीता अटी व शर्ती नुसारनियमा नुसार कार्यवाही करण्यात यावी.व प्रमोद आनंदा ठुबे यांनी स्थायी समितीमध्ये अर्ज देवून अंबिकानगर बस स्टॉप जवळ,बालाजी कॉम्प्लेक्स शोजारी १०x१५ चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर देणे करीता अटी व शर्ती नुसारनियमा नुसार देण्यात यावी.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा तसेच अर्जदार यांचे मागणी नुसार पार्किग करीता जागा भाडेतत्वावर देणे करीता अटी व शर्ती नुसारनियमा नुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार अर्जदार मोहित मंजित मदान यांना नोबल हॉस्पीटल लगत व गजेंद्र प्रकाश सैंदर यांना जुना दाणे डबरा ते ग्राहक भांडार परिसरातील जागा पे ॲण्ड पार्किग व्यवसाया करीता भाडेतत्वावर अटी व शर्ती,नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी व अर्जदार श्री.प्रमोद आनंदा ठुबे यांचे मागणी नुसार केडगांव येथील अंबिका नगर बस स्टॉप जवळील बालाजी कॉम्प्लेक्स शेजारील १०x१५ चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर देणे करीता अटी व शर्ती नुसारनियमा नुसार देण्यात यावी.

**ठराव :-** अर्जदार छबुबाई विश्वनाथ ठोंबे, रा.आरणगांव रोड, वॉर्ड क्र.२५ बिल नं.१९८ नुसार आकारण्यात आलेल्या यांना नळकनेक्शन नसतांना लावण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम रूपये ११,५१३/- निर्लेखीत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.तसेच शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार अर्जदार मोहित मंजित मदान यांना नोबल हॉस्पीटल लगत व गजेंद्र प्रकाश सैंदर यांना जुना दाणे डबरा ते ग्राहक भांडार परिसरातील जागा पे अॅण्ड पार्किग व्यवसाया करीता भाडेतत्वावर अटी व शर्ती नुसार कार्यवाही करण्यात यावी. महानगरपलिकेला पे अॅण्ड पार्कीग पासुन चांगल्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.अर्जदारा यांचे मागणी नुसार अटी व शर्ती प्रमाणे पार्कीग व्यावसाया करीता जागा भाडेतत्वावर देण्यास व अर्जदार श्री.प्रमोद आनंदा ठुबे यांचे मागणी नुसार केडगांव येथील अंबिका नगर बस स्टॉप जवळील बालाजी कॉम्प्लेक्स शेजारील १०x१५ चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेस सभा मान्यता देत आहे.

याकामी क्षेत्र निश्चिती करावी व करारनामा,अटी/ शर्ती ,अनामत रक्कम,दरमहा जागा भाडे, वाहन पार्किग चे दर इ. या बाबत पुढील कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी. शहरातील इतर जागा पे व पार्क तत्वावर पार्किग चालविणे करीता देण्याबाबत कार्यवाही करावी.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- ११ सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या दिनांक १५/१/२००८ अधिसुचनेव्दारे नागापुर एम.आय.डी.सी.ब्लॉक हा भाग सर्व्हे नंबर ९ ते २१ हद्दीतुन वगळयामुळे बील क्र.१ ते २३१ कर आकारणी बीले रद्द करणे व मागील थकबाकी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ नागापुर उपविभाग

नागापुर कार्यालय विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड क्र.७१ मध्ये नागापुर एमआयडीसी ब्लॉक क्रमांक एल.एम.होता.दि.३०/६/१९९९मध्ये तत्कालीन नगरपारिष्द असताना लहान लहान (१२ ाावांचा) समावेश होवून दि.१/७/१९९९रोजी शहरपालिका हद्द वाढ होवून नागापुर एम आय डी सी ब्लॉक क्र.एल एम समावेश होता.

अहमदनगर महानगरपालिका दि ३० जुन २००३ रोजी घोषित करण्यात आलेली होती.तत्कालीन नगरपरिषदे मार्फत सन २००१/२००२ मध्ये हद्दवाढ भागासह संपुर्ण नगर शहराकरिता घरपट्टी आकारणी बाबत सर्व्हे घेण्यात आलेला भागासह सन २००३/२००४ मध्ये कर आकारणी करण्यात आलेली आहे.

सदर घरपट्टी कर आकारणी सर्व्हे मध्ये परिशिष्ट अ फॉर्म पुस्तक बी क्र.१ ते २३१ नोंदी कर आकारणी करणेत आलेली आहे.महाराष्ट्र शासन नगर विकास दि.१५ जानेवारी २००८ रोजी अधिसुचनाव्दारे नागापुर एम.आय.डी.सी. एम.एम भाग अहमदनगर महानगरपालिका (स.नं.९ ते २१) हद्दीतुन वगळले बाबत अधिसुचना पारित केल्याने १५ जानेवारी २००८ (सन ०७/०८) पासुन सदर बीले आकरणी रद्द करण्याबाबत व मागील थकबाकी सन ०६/०७पर्यत असणा-या थकबाकी बाबत अहवाल माहितीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे कर निरीक्षक कर यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,रिव्हीजन विभाग

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,वॉर्ड क्र.७१ नागापुर एम आय डि सी ब्लॉक क्र.एम एल या वॉर्ड करीता तत्कालीन कर्मचारी जे पी शिंदे काम पहात होते त्यांचे कार्यकाळातील अर्ज प्रकरणे कार्यालयीन मंजूर प्रकरणे उपलब्ध होत नाहीत तसेच शिंदे यांचे दि.३१/८/११ रोजी निधन झाले आहे.वॉर्ड क्र.७१मधिल एम आय डी सी ब्लॅक क्र.एल एम कर आकारणी रदद करणे बाबत व थकबाकी बाबत प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,रिव्हीजन विभाग.

यावर सहाय्यक कर निर्धारण कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक नागापुर कार्यालय यांचे प्रस्तावाप्रमाणे नागापुर येथील औदयागीक वसाहत मधील एल व एम ब्लॉक (स नं ९ ते २१) हा महाराष्ट्र शासन नगरविकास मंत्रालय मुंबई ०२ यांचे दि.१५ जाने २००८ आदेशानुसार मनपा हद्दीतून वगळयात आला असल्याने त्यावरील आकारणी रद्द करून डिमांड कमी करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांच्या शिफारशीनुसार अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,आकारणी रद्द करणे ,निर्लेखित करणे ,डिमांड कमी करणे या विषयी कायदयातील तरतुदींचा उपयोग करून स्पष्ट अभिप्राय दयावा.

यावर सहाय्यक कर निर्धारण कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि.१९४९ चे कराधान प्रकरण ८ मधील कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा.आयुक्त साहेबांना मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करण्याची तरतुद असल्याने सदर प्रस्तावात नमुद शासन निर्णय १५ जाने. २००८ पासुन थकबाकी निर्लेखित करणेस मान्यतेस सादर तसेच सन २००८ पुर्वीच्या थकबाकी बाबत विधी तज्ञांचे मत घेणे उचित वाटते.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,

*दि.१/७९९ ते १५ जाने २००८ अखेर कराची आकारणी नियमानुसार करण्यात यावी.

*दि.१५/१/२००८ नंतर कराची होणारी रक्कम क्ष नुसार निर्लेखित करावी.

*थकबाकी वसुली प्रत्यक्ष असलेले ग्रामपंचायत मार्फत जावून वसूली करावी. मे. आदेशार्थ सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार महाराष्ट्र प्रांतीक मनपा अधि १९४९ चे कलम १५२ नुसार तसेच शासन निर्णय १५ जाने २००८ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या दिनांक १५/१/२००८ अधिसुचनेव्दारे नागापुर एम.आय.डी.सी.ब्लॉक हा भाग सर्व्हे नंबर ९ ते २१ हद्दीतुन वगळयामुळे बील क्र.१ ते २३१ कर आकारणी बीले रद्द करणे व मागील थकबाकी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- तो अहवाल काय आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- १/७/१९९९ ला आपली हद्दवाढ झाली.त्यानंतर १५/१/२००८ मध्ये सदरचा भाग हद्दीतुन वगळण्यात आला.त्यामुळे आपण १/७/९९ ते १५/१/००८ पर्यत ची डीमांड आहे तशीच ठेवून १५ जानेवारी नंतर सदरचा भाग हद्दीमधून वगळल्या मुळे आपल्या दर वर्षीच्या डिमांमध्ये येत असल्याने १५जाने.२००८ नंतर ची रक्कम आहे ती निर्लेखित करणे आवश्यक आहे.सदरच्या मालमत्ता आपल्या हद्दीत राहिलेल्या नाहीत.त्यापुर्वीची काही रक्कम भरलेली आहे.काहि रक्कम बाकी आहे.आपण संबंधीतांना नोटिसा देवून कळवून पूर्वी ची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

बाळासाहेब बोराटै :- हद्दीतुन वगळण्यापुर्वीची रक्कम कशी वसूल करणार.

मा.उपायुक्त श्री.बहेरे :- एम.आय.डी.सी.च्या जागेमधील या जागा आहेत.निर्लेखीत करावयाच्या मालमत्ताधारकांची यादी सोबत जोडली आहे.२३१ मालमत्ता धारक आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटेः-या मालमत्ता धारकांची आधी वसूली करण्यात यावी.नंतर हद्दवाढ झाल्याने निर्लेखीत करण्यात यावी.एखादया नागरीकाला नळकनेक्शन घ्यावयाची असल्यास आपण त्याला आधी पट्टी भरण्यस सांगतो,त्याच प्रमाणे आधी सर्व वसुली झाल्यावरच रक्कम निर्लेखीत करण्यात यावी.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे:-या मालमत्ता धारकांची वसुलीची प्रक्रीया ग्रामपंचायती मार्फत करावी लागेल.आपल्याला सक्ती करणे शक्य होणार नाही.आपल्या हद्दीतच हा भाग राहिला नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पुर्वी तर होते आपल्या हद्दीत.आधी पट्टीभरून घ्या नंतर निर्लेखित करा असे माझे मत आहे.

मा.सभापती साहेब :- त्यांची जी जुनी पट्टी असेल भरली तर आपली घरपट्टी /पाणीपट्टी निर्लेखित करण्यात येईल,असा आपण आदेश देवू.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- वसुली बाबतचा पाठपुरवा चालू आहे.सक्तीची कारवाई आपल्याला करता येत नाही.त्याची महसुल पध्दतीने आपल्याला वसुली करावी लागणार आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- आपण जर त्यांची पट्टी निर्लेखीत केली नाही,तर त्यांच्यावर काय परिणाम होवू शकतो.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे:- त्यांच्या वर याचा काहीच परिणाम होणार नाही,निर्लेखीत केली काय किंवा नाही केली काय.हे आपल्या डिमंडचे आकडे फुगवून दिसतात आज रोजी.निर्लेखीत केल्यास आपली डिमांड कमी होईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हो भाग एम.आय.डी.सी. मधील आहे का?

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- हो.एम.आय.डी.सी.मध्ये आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नागापुर ग्रामपंचायतील आपण कळवू शकतो ना, यांची थकबाकी.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आपण कळविले आहे.आपण तहसीलदार यांचे मार्फत वसुली ची कार्यवाही करू शकतो.आज रोजी आपली डिमांड जास्त दिसत असल्याने आपली वसुलीची टक्केवारी कमी होते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- किती मालमत्ता धारक आहेत.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-२३१ मालमत्ता धारकांची रू.१३लाख ८२ हजार रक्कम आहे.सन २००८ नंतरची बाकी आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- सन २००८ पर्यत ते हद्दीत होते तो पर्यतची पट्टी भरून घ्या.

मा.सभापती साहेब :- आपण कोणतेही निर्लेखीत चे प्रकरण आल्या नंतर आधीची पुर्ण रक्कम भरून घेतल्या नंतर उर्वरित रक्कम निर्लेखीत करतो किंवा कसे करतो.प्रभाग अधिकारी यांनी सांगा.

मा.उपायुक्त साहेब :- निर्लेखीत करण्याची ची १५२ ची तरतुद आहे.ज्यावेळी सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही वसुल होत नसेल,त्यावेळी ती रक्कम आपण निर्लेखीत करतो.

मा.सभापती साहेब :- निर्लेखीत करणे बाबत आमचे काही म्हणणे नाही,पुर्वीची वसुली कशी करणार,राहिलेले पैसे ते भरणार नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- त्यांची मागणी नाही निर्लेखीत करण्याची.

मा.सभापती साहेब :- त्याची डिमांड किती आहे ते सांगा.किती लोकांची

प्रभाग अधिकारी श्री.सारसरः- २३१ मालमत्ता धारकांची रू.१३ लाख ८२ हजार रक्कम आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ठराव असा करा कि,२००८ पुर्वीची पट्टी जे भरतील त्याची पट्टी निर्लेखीत करण्यात येईल.

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- त्या मालमत्ता धारकांना निर्लेखीत काही घेणे देणे नाही राहीलेले.

मा.श्री.दिलीप सातपुते :- त्याची मागणी नाही तर आपण का आग्रह करू राहीला निर्लेखीत करण्याची.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- त्या वॉर्डची टक्केवारी कमी दिसते.आकडे फुगीर दिसतात.२००८ पुर्वीची रक्कम माफ करा असे आपण म्हणतच नाही.

मा.सभापती साहेब :- २३१ मालमत्ता धारकांना नोटिसा काढा.त्या नोटिस मध्ये उल्लेख करा,२००८ पुर्वीची आपण मुळ रक्कम भरली तर २००८ नंतरची रक्कम निर्लेखीत करण्यात येईल.अशा प्रकारची नोटिस दया.पैसे वसूल होतील आपले.नाहि पैसे भरले तर मग काय कारणार.संबंधीत मालमत्ता धारकांना सुध्दा गरज पाहिज.आपण आपली डिमांड कमी करण्यासाठी निर्लेखीत करतो.पण त्यांनी सुध्दा पैसे भरले पाहिजे.जे २००८ पुर्वीचे पैसे भरतील त्यांचेच प्रकरण निर्लेखीत करण्यात येईल.जे पैसे भरणार नाहीत त्यांची बाकी तशीच ठेवा.उदया पत्रकार बंधुनी वर्तमान पत्रामध्ये छापल्यानंतर त्यांना समजेल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- माझ्यावर बॅकेची बाकी होती,तरी सुध्दा मला बॅकेचे पैसे भरल्यानंतर नो-डयुज घेवून निवडणूकीचा फॉर्म भरावा लागला.बॅकेचा आणि महानगरपालिकेचा काय संबंध होता.त्याप्रमाणे तेथील नागरीकांना निवडणूकी करीता महानगरपालिकेचे पैसे भरल्याशिवाय उभे रहाता येणार नाही.असे काही करता येईल का ते पहा.

मा.सभापती साहेब :- तहसील दारांना पत्र देवून त्यांची थकबाकी कळवा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ७/१२ उता-यावर बोजा चढवा.लोक स्वत:येवून पैसे भरतील.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अहमदनगर महानगरपालिकेची दि.१/७/१९९९ ला आपली हद्दवाढ झाली.त्यानंतर १५/१/२००८ मध्ये सदरचा भाग हद्दीतुन वगळण्यात आला.त्यामुळे आपण १/७/९९ ते १५/१/००८ पर्यत ची डीमांड आहे तशीच ठेवण्यात आली आहे.या वसुली करीता कोणतीही ठोस कारवाई केल्याचे ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद नाही.सदर कालावधीमधील त्या मालमत्ता धारकांची मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली होईल.त्या मालमत्ताधारकांची सन २००८ नंतरची मालमत्ता कर व पाणीपट्टी निर्लेखीत करण्यात यावी.अन्यथा निर्लेखित करण्यात येवू नये.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- अहमदनगर महानगरपालिकेची दि.१/७/१९९९ ला आपली हद्दवाढ झाली.त्यानंतर १५/१/२००८ मध्ये सदरचा भाग हद्दीतुन वगळण्यात आला.त्यामुळे आपण १/७/९९ ते १५/१/००८ पर्यत आधी करण्यात यावी त्यानंतरच पुढील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्यात यावी.आपण जर सन २००८ नंतरची घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित केली तर पुर्वीची वसुली होणार नाही.या वसुली करीता नियमानुसार योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सभागृहात झालेल्या चर्चे नुसार, ,वॉर्ड क्र.७१ मध्ये नागापुर एम आय डी सी ब्लॉक क्रमांक एल.एम.होता.दि.३०/६/१९९९ मध्ये तत्कालीन नगरपारिषद असताना लहान लहान (१२ गावांचा ) समावेश होवून दि.१/७/१९९९ रोजी शहरपालिका हद्द वाढ होवून, नागापुर एम आय डी सी ब्लॉक क्र.एल एम समावेश होता. अहमदनगर महानगरपालिका दि ३० जुन २००३ रोजी घोषित करण्यात आलेली होती.तत्कालीन नगरपरिषदे मार्फत सन २००१/२००२ मध्ये हद्दवाढ भागासह संपुर्ण नगर शहराकरिता घरपट्टी आकारणी बाबत सर्व्हे घेण्यात आलेला भागासह सन २००३/२००४ मध्ये बी क्र.१ ते २३१ नोंदी घेवून कर आकारणी करणेत आलेली आहे.त्यानंतर (स.नं.९ ते २१) हद्दीतुन वगळले बाबत अधिसुचना पारित केल्याने १५ जानेवारी २००८ (सन ०७/०८) पासुन सदर बीले आकरणी रद्द करण्याबाबत व मागील थकबाकी सन ०६/०७पर्यत असणा-या २३१ मालमत्ता धारकांची रू.१३ लाख ८२ हजार रक्कम आहे.निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट सादर करण्यात आलेला.आहे.सदर रिपोर्ट मध्ये आकारणी केल्या पासुन सन २००८ पर्यतच्या वसुली बाबत काहीही कारवाई केल्याचा उल्लेख दिसुन येत नाही. ही वसुली होणे आवश्यक असल्याने यावसुली करीता सदरील मालमत्ताधारकांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.ज्या मालमत्ता धारकांकडून थकबाकी वसुली होईल.अशा मालमत्ता धारकांची सन २००८ नंतरची राहीलेली रक्कम निर्लेखित करण्यस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चे नुसार, ,वॉर्ड क्र.७१ मध्ये नागापुर एम आय डी सी ब्लॉक क्रमांक एल.एम.होता.दि.३०/६/१९९९ मध्ये तत्कालीन नगरपारिषद असताना लहान लहान (१२ गावांचा ) समावेश होवून दि.१/७/१९९९ रोजी शहरपालिका हद्द वाढ होवून, नागापुर एम आय डी सी ब्लॉक क्र.एल एम समावेश होता. अहमदनगर महानगरपालिका दि ३० जुन २००३ रोजी घोषित करण्यात आलेली होती.तत्कालीन नगरपरिषदे मार्फत सन २००१/२००२ मध्ये हद्दवाढ भागासह संपुर्ण नगर शहराकरिता घरपट्टी आकारणी बाबत सर्व्हे घेण्यात आलेला भागासह सन २००३/२००४ मध्ये बी क्र.१ ते २३१ नोंदी घेवून कर आकारणी करणेत आलेली आहे.त्यानंतर (स.नं.९ ते २१) हद्दीतुन वगळले

बाबत अधिसुचना पारित केल्याने १५ जानेवारी २००८ (सन ०७/०८) पासुन सदर बीले आकरणी रद्द करण्याबाबत व मागील थकबाकी सन ०६/०७पर्यत असणा-या २३१ मालमत्ता धारकांची रू.१३ लाख ८२ हजार रक्कम आहे.निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट सादर करण्यात आलेला.आहे.सदर रिपोर्ट मध्ये आकारणी केल्या पासुन सन २००८ पर्यतच्या वसुली बाबत काहीही कारवाई केल्याचा उल्लेख दिसुन येत नाही. ही वसुली होणे आवश्यक असल्याने यावसुली करीता सदरील मालमत्ताधारकांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.ज्या मालमत्ता धारकांकडून थकबाकी वसुली होईल.अशा मालमत्ता धारकांची सन २००८ नंतरची राहीलेली रक्कम निर्लेखित करण्यस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १२ सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. झिने संदीप मोहनलाल , रा. गुलमोहर रोड सावेडी,अ.नगर वॉर्ड क्र.५२, बील नं.६९८ चे सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ अखेर मोबाईल टॉवरची करण्यात आलेली कर आकारणी शास्तीसह रक्कम कायमस्वरूपी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ नागापुर उपविभाग

सावेडी वसुली विभाग वॉर्ड क्र.५२ चे वसुली लिपीक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड क्र.५२ बिल क्र.६९६ चे मालमत्ताधारक श्री.झिने संदीप मोहनराव यांनी दि.२४/०९/२०१३ रोजी इकडील कार्यालयाकडे नरहरीनगर,अजिंक्यतारा अपार्टमेंट ,टाटा टेली सर्व्हिसेस कंपनीचा मोबाईल टॉवर होता.सदर कंपनीने सन २००७-२००८ अखेर टॅक्सेस भरले आहे.सन २००८-२००९ पासुन कंपनीने टॉवर काढून घेतलेला आहे.कुठल्याही प्रकारे टॉवर अस्त्विात नाही.घरपट्टी कमी करण्याबाबत विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

टाटा टेलि सर्व्हीसेस लि.कं.सन २००७-०८ अखेर धनादेश क्र.००३७८२ दि.३१/१२/०७ युनायटेड वेसअर्न रू.२७७९० अन्वये कराचा भरण केलेला आहे.

सदर मोबाईल टॉवरबाबत जा.ग्र.७९७ दि.४/१०/२००७ अन्वये मा.उपायुक्त (सा) यांनी सावेडी स.नं.३९/१ ड येथील भुखंड क्र.२ या मिळकतीवरील विनापरवाना आधिकृत टॉवरचे बांधकाम करून टॉवर उभारले व वापर सुरू केला असल्याचे सिध्द होत आहे.सदरील बांधकाम करून उभारलेले टॉवर विनापरवाना अनार्धिकृत ठरविण्यात येत आहे.सदर बांधकाम टॉवरजनरेटर व मशिनरी इत्यादी आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत गैरतक्रारदार यांनी स्वत:घ्यावे अन्यथा महानगरपालिकेमार्फत काढण्यात येईल व होणारा खर्च संबंधीतांकडून वसुल करण्यात येईल असा आदेश देण्यात आलेला होता.अर्जदार यांचे अर्जादार यांचे अर्जानुसार दि.३/९/१५ रोजी समक्ष जागेची पाहणी केली असता मोबाईल टॉवर पाहणीनुसार तसेच देण्यात आलेल्या आदेशानुसार अस्त्विात नसलेल्या मोबाईल टॉवर थकबाकी सन २००८-०९ ते २०१६ अखेर रू.५५,८५४ + शास्ती वसुल होणारी नसुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसुल होण्याजोगी नसले ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल. तथापी अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय कि,सदर प्रकरणी मा.उपायुक्त साहेब यांचे जा.क्र.७९७दि.४/१०/२००७(अतिक्रमण विभाग) अनाधिकृत पणे मोबाईल टॉवरचे केलेले बांधकाम स्वत:हुन काढुन घेणे बाबत दिलेल्या आदेशानुसार सदरचे मोबाईल टॉवरचे बांधकाम व टॉवर काढणेस आलेला असल्याने व्यावसायीक सन २००८-०९ ते २०१६ अखेर रू.५,५८,५४९/- + शास्ती वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ नुसार मा.आयुक्त साहेब यांना स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय कि,रिव्हीजन विभाग आपला अभिप्राय देण्यात यावा.

यावर सहाय्यक कर निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणातील मोबाईल टॉवर अस्तीत्वात नसल्याने सन २००८-०९पासुन आकारणी रद्द करून असलेला मालमत्ता कर वसूल होणार

नसल्याने उक्त अधिनियमातील कलम १५२ नुसार सदर रक्कम निर्लेखित करणेसाठी स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मालमत्ता धारकाने विलंबाने अर्ज केल्याचे दिसून येते.सबब कार्यवाही कोत्या वर्षापासून करावयाची या बाबत सहाय्यक कर निर्धारक कर संकलन अधिकारी यांनी स्पष्ट अभिप्राय देवून सादर करणे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,सदर मालमत्ता धारकाकडे टाटा टेली सर्व्हिसेस लि.कं.मोबाईल टॉवर हे भाडेकरू म्हणून होते.ते सन ८/९ साली सोडून गेले मालकाकडे विचारणा केली असता टाटा कंपनीने मनपाला कळविणे आवश्यक होते असे सांगीतले परंतु तसे न झाल्याने त्यांनी मनपाकडे अर्ज सादर केल्याचे दिसुन येते.सबब मालमत्ता धारकाकडून विलंब झाल्याचे दिसुन येते.तरी प्रस्तुत कार्यवाही सन २००८-०९पासून करणे योग्य राहिल.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, फेरसादर प्रस्तावान्वये प्रभाग अधिकारी यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.सन २००८-०९पासुन सदर प्रकरणी काय काय पत्रव्यवहार झाला व कार्यवाही काय झाली यावर तपशील माहितीसह ठेवा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या कडील लोकशाही दिनातील तक्रार दाखल अजिंक्य तार कॉम्प्लेस,गुलमोहर रोड या इमारतीवरील टाटा इंडिकॉम चे टावर विना परवाना उभारणी केली असल्याने तेथील रहिवासी यांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने विना परवाना टॉवर चे बांधकाम काढून टाण्या विषयी तक्रारी अर्ज दाखल केला होता.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा.उपायुक्त सोहेब यांच्या दालनातुन सुनावणी होवून अतिक्रमण विभाग जा.क्र.७९७/४/१०/०७अन्वये सदरचे टॉवर व मनोरा १५ दिवसांत स्वतःकाढून टाकण्यात यावे अन्यथा मनपा तर्फे सदरचे अनाधिकृत टॉवर काढण्यात येईल असा आदेश पारित करण्यात आलेला होता.
सदर आदेशान्वये टॉवर काढण्यात यावे मात्र मालमत्ता कर आकारणी कमी करण्याबाबत अर्ज दाखल केलेला नाही.दि.२४/०९/१३ रोजी मालमत्ता कर आकारणी कमी करण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सबब सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासुन कलम १५२ नुसार सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी स्थायी समिती च्या मान्यतेस्तव पाठविण्यास आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,भविष्यात शासकीय लेखापरिक्षणात आक्षेप निघाल्यास तत्कालीन संबंधीत कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करण्यास अधिन राहून प्र.अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावितनुसार नमुद क्ष प्रमाणे मा.स्थायी समितीकडेस प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अ प्रमाणे मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. झिने संदीप मोहनलाल , रा. गुलमोहर रोड सावेडी,अ.नगर वॉर्ड क्र.५२, बील नं.६९८ चे सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ अखेर मोबाईल टॉवरची करण्यात आलेली कर आकारणी शास्तीसह रक्कम कायमस्वरूपी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- या बाबत सविस्तर माहिती दया.

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- श्री.झीने यांनी त्यांचे मालमत्तेवर टॉवर उभा केला होता.नागरीकांनी त्या बाबत महानगरपालिकेमध्ये तक्रारी केल्या होत्या.सदर टॉवर मुळे आरोग्यास धोका असल्याबाबत.त्यानंतर मा.उपायुक्त यांचे समोर सुनावनी होवून टॉवर काढणे बाबत सुचना देण्यात आली.त्यानुसार संबंधीत जागा मालकाने टॉवर स्वखर्चाने काढण्यात आला. परंतु सदर टॉवरची घरपट्टी कमी करून घेणे करीता त्यावेळी अर्ज करण्यात आला नव्हता.

मा.सभापती साहेब :- यापुर्वीची रक्कम त्यांनी भरली आहे का?

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- हो भरली आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- टॉवर काढल्यानंतर कंपनीचे अग्रीमेंट कॅन्सल केले आहे का?

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- हो कॅन्सल केले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. झिने संदीप मोहनलाल , रा. गुलमोहर रोड सावेडी,अ.नगर वॉर्ड क्र.५२, बील नं.६९८ चे सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ अखेर मोबाईल टॉवरची आकारणी निर्लेखित करण्यास हि सभा मान्यता देत आहे

**ठराव :-** अर्जदार श्री. झिने संदीप मोहनलाल , रा. गुलमोहर रोड सावेडी,अ.नगर वॉर्ड क्र.५२, बील नं.६९८ चे सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ अखेर मोबाईल टॉवरची आकारणी निर्लेखित करण्यास हि सभा मान्यता देत आहे.तसेच शास्ती निर्लेखित करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १३ सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग.

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१४४०

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे तसेच मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांचे दि.२१/०९/२०१६ चे मंजुरी अन्वये अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक.२० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेस -

**Blow Moulded Container with LID & Handle**
**Bin -Top -** O.D.328 (L)x 360(H) mm approx
**Bottom -** O.D. 279 mm approx
**LID -** 328(L) x 75(H) mm approx
**Total Height with Lid –** 400 mm approx
**Capacity -** 20 Ltrs.
**Colour -** Red

याप्रमाणे सविस्तर स्पेसिफिकेशनचे - ३००० नग खरेदीकामी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन **www.amc.gov.in** व **http://amc.maharashtra.etenders.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस तसेच जाहिर टेंडर नोटीस प्रथम वेळ मुदतवाढ प्रसिध्द करुन ई-निविदा क्र.१४४० अन्वये निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)क्रिश इंन्ट्राट्रेड प्रा.लि.,औरंगाबाद
२)तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर
३)युनिव्हर्सल ट्रेडलिंक,अहमदनगर

अशा एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता **Blow Moulded Container with LID & Handle** उपरोक्त नमुद केलेल्या सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे रक्कम रु.२७५=०० / १ नग हा दर तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

दि.०६/१२/२०१६ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता प्रस्तावित डस्टबीन - ३००० नग खरेदीकामी प्राप्त एकूण तीन ई-निविदांपैकी तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर यांचा रु.२७५=०० प्रति १ नग हा दर स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला असल्याने या दराने ३००० नग डस्टबीन खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८,२५,०००=००मात्र(अक्षरी रक्कम रुपये.आठ लक्ष पंचवीस हजार मात्रचे)खर्चास मंजुरी देणेबाबत व डस्टबीनवर 'अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग' असे नाव टाकणेबाबत शिफारस मा.प्रशासकीय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांचे दि.१३/०१/२०१७ चे आदेशान्वये प्रस्तावितनुसार दरपत्रकाच्या डस्टबीनचे सँम्पल निविदाकार तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर यांचेकडून जा.नं.स्टोअर विभाग-२९७
दि.१९/०१/२०१७ अन्वये मागणी करण्यात येवून त्यांचेकडून प्राप्त झालेला प्रिंन्सवेअर फाईन होमवेअर या कंपनीचा मॉडेल नं.**L2021-SW** डस्टबीनचा नमुना समक्ष पाहून निविदेमध्ये दिलेल्या रक्कम रुपये.२७५=०० / १ नग या दराने **L2021-SW Garbage Bucket 021 with Swing Lid** - ३००० नग खरेदीस त्याकामी येणा-या रक्कम रु.८,२५,०००=००मात्र(अक्षरी रक्कम रुपये.आठ लक्ष पंचवीस हजार मात्रचे)खर्चास मा.अतिरिक्त आयुक्त तथा प्र.आयुक्तसाहेब यांनी दि.०९/०२/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग - ३२७ दि.१३/०२/२०१७ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.२२/०२/२०१७ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे.

सदर बाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.२३/०२/२०१७ चे प्रस्तावावर -
मा.मुख्य लेखापरिक्षक "लेखा परीक्षण करण्यात आले लेखा परीक्षण अभिप्राय / त्रुटी निरंक".
मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "यथाप्रस्तावित नूसार 'अ' व खर्चास मान्यतेस्तव सादर"असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.
मा.आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त अहवालामधील 'अ' प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करावा" असा अभिप्राय नमूद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१४४० - प्रभाग क्रमांक.२० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.
येणे प्रमाणे विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,त्रुटी निरंक
यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित नुसार क्ष मान्यतेस्तव सादर.
यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालानुसार अ प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.
मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ७३ ड मध्ये काय आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- स्थायी समिती कडे माहितीस्तव हा विषय आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कलम काय आहे ते आम्हाला समजले पाहिजे.

मा.उपायुक्त साहेब :- कचरा साठविण्यासाठी कंन्टेनर खरेदी केली असुन या कलमा नुसार स्थायी समिती पुढे माहितीस सादर केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोणत्या निधी मधून खरेदी केली आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- नगरसेवक निधी मधून खरेदी केली आहे.

मा.सभापती साहेब :- ७३ ड वाचा साहेब

मा.उपायुक्त साहेब :- ज्या निविदा मा.आयुक्तांनी मंजूर केल्या असतील त्या माहितीस्तव स्थायी समिती पुढे सादर कराव्यात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आमच्या वॉर्ड मध्ये सुध्दा हे कंन्टेरनर दया,

मा.सभापती साहेब :- किती दिवस झाले मा.आयुक्तांना पत्र दिले आहे.या विषया प्रमाणे इतर विभागांची माहिती येत नाही.हाच विषय आमच्या कडे का पाठविला.

मा.उपायुक्त साहेब :- स्टोअर विभागाकडून हि कार्यवाही नेहमी केली जाते.तुम्ही म्हटल्या प्रमाणे ७३ ड ची तरतुद,रू.५ लाखा पेक्षा जास्त व रू.२५ लाखा पेक्षा कमी ज्या निविदा असतात.त्या सर्व मा.आयुक्तांकडून मंजूर केल्या जातात.त्याची संविदा केल्यानंतर त्याची माहिती १५ दिवसांच्या आत स्थायी समितीला माहिती त्यांनी कळवायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- आम्ही प्रत्येक मिटींग मध्ये सांगतो,मा.आयुक्तांनी जेवढे मंजूर केले आहे.तेव्हढे सर्व विषय आमच्या कडे पाठवा,आमच्या कडे एक सुध्दा प्रकरण आले नाही.ज्यांनी माहिती दिली नाहि त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हे कोणाकडचे प्रकरण आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- स्टोअर विभागाकडील आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- माहिती सांगा.कसे केले हे प्रकरण.आमच्या वॉर्ड मध्ये सुध्दा राबवितायेईल.कोणत्या निधी मधून खरेदी केली.

स्टोअर विभाग प्रमुख श्रीमती कमळापुरकर :- नगरसेवक निधी मधून खरेदी करण्यात आली.

मा.उपायुक्त साहेब :- नगरसेवक स्वच्छा निधी मधील आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- किती रूपयांचे आहे.सर्व सविस्तर माहिती दया.

स्टोअर विभाग प्रमुख श्रीमती कमळापुरकर :- यांनी प्रस्तावाची माहिती वाचून दाखविली.

मा.सभापती साहेब :- ही निविदा आमच्या माहिती साठी आली की मंजूरीसाठी आली.

स्टोअर विभाग प्रमुख श्रीमती कमळापुरकर :- माहितीसाठी

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- २९ तारखेला आपल्यापा जी.आर.आला आहे.डस्टबीन वाटू नये म्हणून.मग कशाला मान्यता दयाची.

मा.सभापती साहेब :- या प्रमाणे इतर सर्व विभागंकडील रू.५ लाखाच्यावरील व रू.२५ लाखाच्या आतील जे विषय असतील त्याची स्थायी समितीला माहिती दिल्याशिवाय बिल अदा केले जावू नये.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- सर्व विभाग प्रमुखांनी याची नोंद घ्यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.

सर्व विभाग प्रमुखांना आदेश देण्यात येत आहे की,यापुढे रू.५ लाखाच्या पुढील व २५ लाखाच्या आतील ज्या काही निविदाअसतील,ज्या मंजूर झालेल्या असतील त्यांची स्थायी समितीला माहिती दिल्या शिवाय कोणतेही निविदेचे किंवा बिल अदा करू नये,कॅफो साहेब आपण नोंद घ्या,जर बिल अदा केले तर तुमच्यावर कारवाई होईल.ज्या विषयांची माहिती स्थायी समितीला येईल त्यांचेच बिल अदा केले जाईल.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २० मधील परिसरामध्ये कचरा साठविणेसाठी Blow Moulded Container with LID & Handle - ३००० नग खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच सर्व विभाग प्रमुखांनी रक्कम रू.५ लाखाच्या पुढील व २५ लाखाच्या आतील ज्या निविदा मंजूर झालेल्या असतील त्यांची स्थायी समितीला माहिती दिल्या शिवाय निविदेमधील कामचे बिल अदा करण्यात नये, केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये १५ दिवसांमध्ये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.ज्या विषयांची माहिती स्थायी समितीला देण्यात येईल त्या संविदेमधील कामाचे बिल अदा केले जाईल.ठरावाची अंमलबजावणी न केल्यास नियमानुसार खाते प्रमुख यांचे वर करवाई प्रस्तावीत करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२

विषय क्रमांक- १४ सोमवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग.

विषय :- रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीचा ठेका अतिक्रमण विभागाकडे वर्ग करणे बाबत.

संदर्भ :- अहमदनगर महानगरपालिकेने तयार केलेला आकृतीबंध

संपुर्ण शहरात वेळोवेळी होणारी अतिक्रमण मोहिम

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की,मा.स्थायी समिती ठराव क्र.६१ दि.३०/१/२०१६ अन्वये रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीचा ठेका श्री.साई पेस्ट कंट्रोल गुजरात यांस दि.१५/३/२०१६ ते १४/३/२०१७ अखेर एक वर्षाकरीता रक्कम रू.२६,६१,१११/- मध्ये देण्यात आलेला आहे त्याची मुदत दि.१५/३/२०१७ रोजी संपत आहे.

तथापी रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीचा ठेका अतिक्रमण विभागाकडे वर्ग करणेबाबत खालील बाबींचा विचार करणे उचित होईल.

१. अहमदनगर महानगरपालिकेने तयार केलेला आकृतीबंध मध्ये मार्केट विभागाचा समावेश नाही.
२. अतिक्रमण विभागामार्फत संपुर्ण शहरात वेळोवेळी होणारी अतिक्रमण मोहिम
३. रस्ताबाजु ठेकेदाराच्या पावत्या असलेल्या विक्रेत्याचे अतिक्रमण मोहिमेमुळे होणारे नुकसान.
४. राखी स्टॉल,पतंग विक्रेता,आकाश दिवे विक्रेते,उसाचे चरक,गणपती स्टॉल,लक्ष्मीपुजन स्टॉल,फटाके स्टॉल व इतर सणाच्या स्टॉलच्या पावत्या अतिक्रमण विभागामार्फत होतात.
५. अतिक्रमण माहिमेमुळे संबंधीत ठेकेदारामार्फत वेळोवेळी होणारे पत्रव्यवहार,उदा.ठेका बंद करणेबाबतचे पत्र,हप्ता भ्रण्यास मुदत देणेबाबत पत्र,नुकसान भरपाई मिळणेबाबत पत्र,मुदतवाढ देणे बाबत पत्र इत्यादी.
६. रस्ताबाजु मांडणी फी च्या ज्या विक्रेत्याकडे ठेकेदाराच्या पावत्या आहे अशा विक्रेत्याच्या मालाचे नुकसान व दंड आकारू नये असे अतिक्रमणे विभागत कळवुनही तसेच भ्रमणध्वनी वरून कळवूनही उपयोग होत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता रस्ताबाजु मांडणी फी व स्लॅटर फी वसुलीचा ठेका अतिक्रमणे विभागाकडे र्व केल्यास त्यामध्ये सुसूत्रता येवून कार्यलयाीन कामकाजात निर्माण होणारी अडचण दुर होईल तसेच मार्केट विभागास ठेकेदाराच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.अतिक्रमण विभाग हे मनपाचेच आहे.सस्ताबाजुचा ठेका सुध्दा मनपाने आर्थिक उत्पन्न वाढीकरीता दिलेला आहे.परंतु अतिक्रमण विभागाकडून याबाबत सहकार्य मिळत नसल्याने मार्केट विभागाच्या अडचणी दिवसेंदिवस भर पडत आहे.मार्केट विभागास सदरचा ठेका चालविणे अवघड झाला आहे.रस्ताबाजु ठेक्याच्या सर्व बाबी या अतिक्रमण विभागाशी निगडीत असल्याने याबाबत गांभिर्यपुर्वक विचार होणे आवश्यक आहे.अहमदनगर महानगरपलिकेने तयार केलेला आकृतीबंधमध्ये मार्केट विभागाचा समावेश नसल्याने सन २०१६-२०१७मध्ये रू.२६,६१,१११/-मध्ये १०%वाढ करून म्हणजेच रक्कम रू.२९,२७,२३०/- रकमेची ई - निविदा सन २०१७-२०१८ करिता अतिक्रमण विभागामार्फत अथवा प्रभाग समिती क्र.१ ते४ मार्फत निविदिा काढणे उचित होईल.तसेच सदरची ई - निविदा अहमदनगर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यास तसेच स्थानिक व जिल्हास्तरीय वर्तमान पत्रात सदरची ई - निविदा प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास व कामास मंजूरी मिळणेबाबत रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभागा प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.अतिरीक्त आयुक्त

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,मार्केट विभाग प्रमुख "अ" व " ब " प्रमाणे कागदपत्रासह माहिती फेर सादर करावी.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, आपल्या अभिप्रायानुसार 'अ' प्रमाणे कागदपत्र सोबत जोडली आहेत.अभिप्रायातील 'ब' नुसार आकृतीबंध बाबतची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत केलेली आहे.सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या फेरसादर अहवाल प्रमाणे ई - निविदा प्रक्रिया सदयस्थिती नुसार मार्केट विभागामार्फत करणे उचित होईल.तथापी टिपणी मध्ये नमुद अनु.क्र.१ ते ६ अन्वये धोरणात्मक निर्णयाकरीता सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रथमतः अति.आयुक्त स्तरावर मार्केट विभाग,अतिक्रमण विभाग,नगररचना विभाग,मा.उपायुक्त (कर),यांची त्वरीत बैठक घेवून महानगरपालिका अधिनियम व नगररचना अधिनियम नुसार सदर प्रस्तावाची विधीग्राहयता तपासणी आणि तद्नंतर निविदेच्या उचित अटी व शर्ती तयार करून मुलेप मार्फत सादर करावे.विलंब करू नये.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त साहेब यांनी आदेशीत केल्यानुसार बैठकीची तारीख व वेळ निश्चित करून मिळावी.त्यानुसार अतिक्रमण विभाग,नगररचना विभागास कळविण्यास रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,बैठकीची दिनांक व वेळ मिळावी.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,मार्केट विभाग प्रमुख दि.२४/१/१७ रोजी ४.३० वा बैठक आयोजित करावी.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर,आपण आदेशीत केल्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांची समक्ष भेट घेवून चर्चा केली असता त्यांनी करारनाम्यातील अटी शर्ती ठीक असल्याबाबत सांगितले तथापी निविदेत स्पर्धा होवून मनपाच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी अटीशर्तीमधील रस्ताबाजू मांडणी फी वसुलीची अनुभव असल्याबाबतची अट निविदेतुन शिथिल करणे उचित वाटते तरी मा.आयुक्त साहेब यांनी निर्देशित केल्यानुसार सदरबाबतीत बैठक आयोजित करून तद्नंतर मा.मुलेप मार्फत सादर करणेबाबत सुचित केले आहे.तरी बैठकीची तारीख व वेळ निश्चित करून मिळावी दि.१४/३/२०१७ रोजी श्री.साई पेस्ट कंट्रोल यांच्या ठेक्याची मुदत संपत आहे.तरी याबाबत लवकर निर्णय घेवून निविदा प्रसिध्द करणे उचित होईल सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, दि.१३/०२/२०१७दुपारी ४ वा.बैठक आयोजित करावी.

अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग दि.१३/०२/२०१७ फेरसादर,इतिवृत्त दि.१३/२/२०१७ रोजी दु.४ वा.मा.अतिरिक्त आयुक्त साहेब ,मा.नगररचनाकार यांच्यावतीने श्री.बल्लाळ साहेब,मार्केट विभाग प्रमुख यांच्या समक्ष झालेल्या रस्ताबाजु मांडणी फी निविदेबाबत बैठकीचे इतिवृत्त खालील प्रमाणे

मा.अतिरिक्त आयुक्त साहेब :- सदर बैठकीस मा.उपायुक्त (कर),अतिक्रमण विभाग प्रमुख यांस पत्र दिले आहे का? ते हजर का नाहीत.

मार्केट विभाग प्रमुख :- मा.उपायुक्त (कर), अतिक्रमण विभाग प्रमुख यांस बैठकीचे पत्र दिले आहे.

मा.अतिरिक्त आयुक्त साहेब :- रस्ताबाजु मांडणी फी वसुलीबाबत नगररचना विभागाचे काय मत आहे?

मा.नगररचनाका यांचे वतीने श्री बल्लाळ :- रस्ताबाजु वसुली ही रस्त्याच्या बाजूला विक्रेत्यांकडून वसुल करण्यात येते.त्यामुळे त्यांस आखणी करून देता येणार नाही.

मा.अतिरिक्त आयुक्त साहेब :- रस्ताबाजु मांडणी फी वसुली अधिनियमातील कोणत्या कलमानुसार वसुल केली जाते.

मार्केट विभाग प्रमुख :- रस्ताबाजु मांडणी फी वसुली अधिनियमातील कलम ३३२ मधील अ,ब,क, नुसार वसुल केली जाते.

मा.अतिरिक्त आयुक्त साहेब :-बैठकीचे इतीवृत्त तयार करून सादर करावे.

वरिलप्रमाणे चर्चा होवून बैठक संपन्न झाली तरी रस्ताबाजू मांडणी फी ई - निविदा प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास व कामास मंजूरी मिळणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त व प्र.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल की,विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई - निविदा क्र.१५०० चे तांत्रिक लिफाफ्यातील अपुर्ण कागदपत्राबाबत आकांक्षा एन्टरप्रायजेस १/९७६,हरिजन वसाहत,नालेगांव,अहमदनगर यांस सन २०१४-१५ चे लेखा विवरण पत्राच्या प्रती २४ तासाच्या आत इकडेस सादर करणेबाबत मार्केट विभाग जा.क्र.५०८ दि.२१/३/१७ अन्वये कळविले होते त्यांनी मुदतीत सन २०१४-१५चे लेखा विवरण पत्राच्या प्रती इकडेस सादर केल्या आहेत.परंतु वैष्णव मंगल आईस फॅक्टरी यांनी दि.२३/३/१७ रोजीचे पत्र देवून मला माझे इतर कामाचे व्याप असल्याने माझा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवू नये तसेच इतर निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडल्यास माझी काही तक्रार नाही असे पत्रात नमुद केले आहे.तरी वेष्णव मंगल आईस फॅक्टरी यांचा व्यापारी लिफाफा उघणे उचित होणार नाही.

तरी ई - निविदा क्र.१५००मधील प्राप्त १ शिवकृपा २ मामा एन्टरप्राईजेस ३ हॉटेल सत्यम ४ साई मशिनरी ५ आकांक्षा एन्टरप्राईजेस या पाच निविदाधारक यांच्या तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्राची छानणी केली असता संबंधीत एजन्सीने निविदा अटी शर्तीनुसार पुर्तता केली असल्याचे या पाच निविदाधारकांचे व्यापारी लिफाफा उघणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

सोबत लिफाफा छानणी तक्ता.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मार्केट विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल की, विषय - रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसूली ई - निविदा क्र.१५००चे व्यापारी निविदा उघणेबाबत मा.उपायुक्त (कर) यांनी दि.२४/३/२०१७ रोजी मान्यता दिली असून सदर व्यापारी लिफाफा दि.२७/३/१७ रोजी सकाळी / दु.१२.३० वा.उघडण्यात आलेले आहेत.प्राप्त निविदेचा तपशील खालील प्रमाणे .

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | शिवकृपा | २२,००,२२०/- |
| २ | मामा एन्टरप्राईजेस | २३,००,१२१/- |
| ३ | हॉटेल सत्यम | ३७,००,३७०/- |
| ४ | साई मशिनरी | ३४,५६,७६९/- |
| ५ | आकांक्षा एन्टरप्राईजेस | २४,००,१११/- |

येणेप्रमाणे ई - निविदेत मे.हॉटेल सत्यम यांची देकार रक्कम रू.३७,००,३७०/-ही मनपाने निश्चित केलेल्या दरापेक्षा सर्वात जास्तीची अल्याने सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार क्ष प्रमाणे उच्चतम दराची निविदा मान्यतेस हरकत नाही.मंजूरीस्तव मे. स्थायी समितीत सादर करणे बाबत तपासुन अहवाल दयावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.उपायुक्त यांचे प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,मा.मुलेप यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,दरपत्रकान्वये मंजूरीस्तव मे.स्थायी समिती सभेत प्रस्ताव पाठविणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :-माझ्या कडे या निविदे संदर्भात एच.१ व एच.२ चे ठेकेदार आले होते.त्यांनी जे पत्र दिलेले आहेत या पत्रांवर मी दि.३/६/२०१७ रोजी अहवाल सादर करणे करीता सुचना केली होती.तो अहवाल वाचून दाखविण्यात यावा.

त्यानुसार मार्केट विभाग प्रमुख यांनी अहवाल सभागृहामध्ये दिला व श्री.बनकर यांनी तो सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

श्री. बनकर:- ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबत.

संदर्भ :- मा.स्थायी समिती सभा क्र.२ दि.३/६/२०१७ २. हॉटेल सत्यम यांचा अर्ज ३.साई मशिनरी यांचा दि.३/६/२०१७ रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की,सन २०१७-१८ करीता रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबत पुर्वीच्या ठेक्याची रक्कम रू.२६, ६१,१११/- यामध्ये १० टक्के वाढ करून म्हणजेच २९,३७,२३०/- ची ई निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.सदर निविदा मनपाच्या वबसाईटवर जिल्हा स्तरीय वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती.

प्राप्त निविदेचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | शिवकृपा | २२,००,२२०/- |
| २ | मामा एन्टरप्राईजेस | २३,००,१२१/- |
| ३ | हॉटेल सत्यम | ३७,००,३७०/- |
| ४ | साई मशिनरी | ३४,५६,७६९/- |
| ५ | आकांक्षा एन्टरप्राईजेस | २४,००,१११/- |

येणेप्रमाणे ई - निविदेत मे.हॉटेल सत्यम यांची देकार रक्कम रू.३७,००,३७०/-ही मनपाने निश्चित केलेल्या दरापेक्षा सर्वात जास्तीची असल्याने सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर केला असता मा.स्थायी समिती सभा क्र.२ दि.३/६/२०१७ रोजी हॉटेल सत्यम यांनी अर्ज देवून काही मुद्दे उपस्थीत केले आहेत.

१. एकविरा चौकातील भाजी बाजार खाजगी जागेत गेला असल्याने मागील ठेका देतांना निविदा रक्कम ही कमी करून श्री.साई पेस्ट कंन्ट्रोल यांना देण्यात आलेला आहे.खाजगी जागेत मनपास वसुलीचे अधिकार नाहित,तसेच सदर जागा खाजगी नसुन या जागेवर घरपट्टी आकारणी करण्यात यावी,सदर जागेत मा.आयुक्त यांच्या परवानगी शिवाय बाजार भरवू नये.असे प्रभाग समिती क्र.१,२,३,४ असे मार्केट विभाग जा.क्र.११५ दि.१८/६/२०१६ अन्वये कळविण्यात आले आहे.त्यामुळे एकविरा बाजाराची रक्कम कमी केली नसल्याने पुनश्च ई - निविदा क्र.१५०० ची रक्कम कमी करण्याची आवश्यकता नाही.तसेच रस्ताबाजुफी व स्लॉअर फी ई निविदा क्र.१५०० मनपाच्या हिताच्या अटी व शर्ती नमुद करून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.हॉटेल सत्यम यांनी पत्रात नमुद केलेल्या बहुतांशी बाबी या महानगरपालिकेच्या दिशाभुल करणा-या आहेत.ठेकाघेतांना प्रत्येक संस्था ही प्रत्येक बाबींचा विचार करून निविदेत भाग घेतात.वसुली करण्याची जबाबदारी ही ठेकाघेणा-या संस्थेची असते.वरील बाबींचा विचार करता हॉटेल सत्यम ठेका चालविण्यास तयार आहे किंवा कसे ठेका चालविण्यास तयार नसल्यास ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली करीता भरलेली बयाना रक्कम जप्त करून सदर दुस-या क्रमांकाचे ठेकेदार साई मशिनरी यांनी दि.३/६/१७ रोजीचे पत्र देवून त्यांनी ई निविदेमध्ये भरलेली रक्कम ३४,५६,७६९/- मध्ये ठेका घेण्यास तयार आहे.व चर्चेस बोलवावे असे इकडेस कळविले आहे.साई मशिनरी यांनी त्यांच्या देयकामध्ये वाढ करून ३७,००,३७०/- ते ठेका घेण्यास तयार असतील तर त्यांना ठेकादेण्यास हरकत नाही.कमाल रकमेमध्ये कमी करण्यात येणार नाही.येणे प्रमाणे स्थायी समितीकडे अहवाल सादर.

मा.सभापती साहेब :- मार्केट विभाग प्रमुख बाहेर सत्यम हॉटेल व साई मशिनरी हे ठेकेदार आले आहेत. त्यांना सभागृहात बोलविण्यात यावे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्याला प्रायव्हेट जागे मध्ये बाजार भरविता येतो का.

मा.सभापती साहेब :- अनाधिकृत पणे तेथे वसुली चालू आहे.महानगरपलिकेचे या मध्ये मोठे नुकसान होत आहे.नाहीतर तेथे भाजी मार्केट करीता आरक्षण टाका.सदर जागा ही प्लॉट आहे.आरक्षण आहेत तेथे.खाजगी प्लॉट वर जर भाजी मार्केट किंवा जागेचा कमर्शियल वापर होत असेल,तर काय केले पाहिजे.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- आरक्षण बदलता येणार नाही.

मा.सभापती साहेब :- त्यांना नोटीस बजावा.

मा.उपायुक्त साहेब :- तुमचे म्हणणे काय आहे ते सांगा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- तुम्ही निविदाधारक आहे का?तुम्हाला रस्ता बाजु फि वसुलीचा अनुभव आहे का? रस्ता बाजू ठेका हा मनपाचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे.यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदार संस्थेसच काम दया.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- नाही,निविदेमध्ये अनुभवाची अट नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हे कसे काय आहे.उपायुक्त साहेब,यामुळे ठेकेदार पळुन जातात.यांना या कामाचा अनुभव नाही.आपण टेंडरमध्ये अट का घातली नाही.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- अडचण अशी आहे साहेब की,ही निविदा प्रसिध्द केली या मध्ये भाजी विक्रेते यांचे स्पॅटचा सर्व्हे केल्यानंतर पाईपलाईन रोड,केडगांव येथील भाजी मार्केट प्रायव्हेट जागेमध्ये आहे.तेथे वसुली करू दिली जात नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- पाईपलाईन रोडचा जो भाजी बाजार आहे तो आत्ता बसलेला नाही.प्रायव्हेट जागेमध्ये बाजार जावून बरेच दिवस झाले.निविदा कालावधी मध्ये बाजार तेथे गेलेला नाही.

निविदाधारक श्री.मोहन दासरवाले :- आम्हाला माहिती नाही.निविदा फॉर्म मध्ये तसे नमुद केलेले नाही,

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- निविदा प्रसिध्द कधी झाली होती.

मा.सभापती साहेब :- त्या निविदेमध्ये तो बाजार आहे का.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आपण वसुली करीता महानगरपालिका हद्द क्षेत्र आपण निविदेमध्ये लिहीतो.

मा.सभापती साहेब :- आपण बाजाराचा उल्लेख करतो का.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- नाही आपण बाजारांचा उल्लेख करीत नाही.ज्यावेळी तुम्ही निविदा भरली त्यावेळी तुम्ही सर्व्हे करणे आवश्यक होते.तुम्ही तो सर्व्हे केला असेल.शहरामध्ये कोठे,कीती लोक,बसतात,आणी त्यानंतर तुम्हाला किती रक्कम परवडणारी आहे.किमान देय रक्कम किती आहे.या आधारे तुम्ही निविदा भरली असेल.आता जेव्हा निविदा उघडल्यानंतर मंजूरीला आल्या नंतर तुम्ही पत्र देता,मला रक्कम देणे शक्य होणार नाही.तुम्ही दिशाभुल करत आहात.तुम्हाला काम करायचे आहे की,नाही.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- आम्हाला पत्र सुध्दा मिळाले नाही.आमची निविदा पास झाली की नाही

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- तुम्हाला नंतर पत्र मिळेल.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- आम्हाला स्थायी समिती मध्ये मंजूरी करीता विषय आल्याचे पत्र मिळाले नाही.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- स्थायी समितीचे पत्र आपल्याला देता येत नाही.स्थायी समिती मध्ये मी असतो, मा.उपायुक्त सामान्य असतात.सर्व विभाग प्रमुख असतात.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- मी छाननी समिती चे बोलतो आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- छाननी समिती मध्ये तुम्हाला नाही बोलवत.छाननी समिती कशासाठी असते,जर दर कमी करावयाचे असतील तर आपण ठेकेदाराला बोलावतो,यामध्ये जी जास्त देकार रक्कम आहे,मागील वर्षी पेक्षा जास्त दर मिळालेला आहे,विभाग प्रमुखांनी शिफारस केली ही रक्कम योग्य वाटते.

मा.सभापती साहेब :- ठेकेदारास छाननी समिती मध्ये बोलावले नाही.तर आम्ही आमची बाजु मांडली असती असे त्यांचे म्हणणे आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- दर वाढवून देणे करीता आम्ही मागणी केली नाही.मंजूर करा अशी शिफारस छाननी समिती कडे केली आहे.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- टेंडर फॉर्म मध्ये अट क्र.२०प्रमाणे सणा निमित्त लागणारे स्टॅल यांची वसुली करता येणार नाही असे तुम्ही नमुद केले आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- आपण ज्या वेळी निविदा भरली त्या वेळी आपण आपल्याला परवडणारी किंमत आपण लिहीतो.या निविदेबाबत तुमचा जो काही आक्षेप आपण लेखी पत्राव्दारे मांडला आहे.स्थायी समितीचा एकच प्रश्न आहे.तुम्ही तुमचे जे काही आक्षेप मांडलेले आहेत.सर्व निविदा प्रक्रिया झाल्यावर तुम्ही मांडत आहे.आता स्थायी समितीला हा निर्णय घ्यायचा आहे.या दरामध्ये तुम्ही काम करणार आहात कि,नाही.थोडक्यात सांगीतलेतर हा विषय संपणार आहे.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- आम्ही भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये काम करण्यास तयार आहोत.पण आपण खाजगी बाजाराचे काय करणार.

मा.सभापती साहेब :- त्यांचे म्हणणे ठिक आहे,खाजगी बाजाराचे आपण काय करणार.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- खाजगी बाजारामध्ये वसूली करू नये असा उल्लेख टेंडर मध्ये आहे का.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- नाही तसा काही उल्लेख आपण केलेला नाही.

मा.दिलीप सातपुतेः-तुम्ही जर वसूलीला गेलेच नाही तर तुम्हाला काय माहित,तेथे वसूली करून देतात की नाही.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- मागच्या ठेकेदारने माहिती दिली,खाजगी जागेत वसूली करून देत नाही म्हणून.दोन बाजार बंद आहेत.

मा.श्री.दिलीप सातपुते :- तुम्ही निविदा भरण्या आगोदर माहिती घेतली की,नंतर.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- निविदा भरल्या नंतर विचारले,अटी व शर्ती मध्ये उल्लेख केला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- निविदेत भरलेल्या रक्कमेमध्ये काम करण्यास तयार आहात का.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- हो तयार आहे.प्रयव्हेट जागेतील बाजाराचे काय कारायचे .

मा.श्री.दिलीप सातपुते :- वसुली करायची

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- तसे अधिकार नाही.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराचे म्हणणे आहे की,त्या ठिकाणी वसुलीचे काय आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- वसुली कायदेशीर करता येते, खाजगी बाजारतील वसुली बाबत निविदाधारकांस रस्ता बाजु फि वसुली करण्याची परवानगी देण्यात येत आहे.या कामी वसुली न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी कार्यवाही करण्यात यावी.कार्यवाही केल्यानंतर देखील वसुली झाली नाही तर त्या प्रमाणात दर आठवडयास आढावा घेवून मनपाने तेवढया रकमेची नुकसान भरपाई ठेकेदार संस्थेकडून देकार रकमेत सुधारणा करून रक्कम स्वीकारण्यात यावी

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- तेथे वसुली करता येते,नियमानुसार.तेथे वसुली करीता काही अडचण आल्यास आपण नोटिस देवून बंद करता येईल.खुल्या प्लॉटला कमर्शियल आकारणी लावू.

मा.सभापती साहेब :- कोणत्याही व्यक्तीने त्याच्या प्रायव्हेट जागेत बाजार सुरू केला,तरी आपल्याला वसूली करता येते.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- हो करता येते,कायदयात तशी तरतुद आहे.

मा.सभापती साहेब :- काय आहे कायदा,वाचून दाखवा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३१(२ ) आहे.कोणत्याही खाजगी व्यक्तीला खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना उघडता येत नाही.जर उघडायचा असेल तर त्या करीता मा.आयुक्त यांची पुर्व परवानगी लागते.त्याव्यक्तीचे मागकी हक्कचे कागदपत्र पाहून परवानगी दिली जाते.सध्या जो बाजार सुरू आहे त्याला आपण परवानगी दिलेली नाही.

मा.सभापती साहेब :- मा.उपायुक्त यांनी सांगीतलेल्या कायदया नुसार, महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये बाजार भरविलेला असल्यास फी वसुली करण्यात यावी.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- महानगरपालकेतर्फे वेळोवेळी अतिक्रमण हटाव मोहीम राबवीण्यात येते त्यावेळी रस्ता बाजु फि वसुल होत नाही तसेच मटन विक्री करणा-या दुकानदारांकडून स्लॉटर फि वसुल होत नाही.त्या करीता मार्केट विभगामार्फत चालू करून देणे करीता कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- वसूली करू दिली नाही तर प्रशासन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करेल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अतिक्रमण हटाव मोहीम दररोज नसते.सलग तीन दिवस ही मोहीम राबविण्यात आली तर,त्याची नुकसान भरपाई मिळणार नाही.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- जर तीन - चार दिवस अतिक्रमण मोहिम चालली तर त्याचे नुकसान आम्ही सहन करू,परंतु तीन दिवसांच्या पेक्षा जास्त दिवस अतिक्रमण मोहीम राबविल्यास त्या प्रमाणात सुट अथवा त्या दिवसांची मुदत वाढ देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- तीन चार दिवस मोहिम चालल्यास आपल्याला नुकसान भरपाई देता येणार नाही,परंतु त्या पेक्षा जादा दिवस मोहिम राबविल्यास त्याची भरपाई किंवा त्या दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी.तसेच मटन विक्री करणा-या दुकानदारांकडून मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली चालू करून दयावी.

हॉटेल सत्यम,ठेकेदार श्री.मोहन दासरवाले :- शहरामध्ये दुचाकी व चार चाकी जुने वाहनविक्रेते त्यांच्या दुकानासमोर अथवा रस्त्यांवर दुचाकी व चार चाकी वाहनांवर सेल असा फलक लावून विक्री करीता वहाने उभी करून ठेवतात.ते महानगरपालिकेच्या जागेमध्ये व्यवसाय करत असून त्यांचे कडून फि वसुल करणे आवश्यक आहे.परंतु हे व्यवसायीक फि देण्यास टाळाटाळ करतात.रस्ता बाजु फि वसुल करणे करीता रोज अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड दयावे लागते.काही वेळा शिवीगाळ किंवा मारहाणीचे प्रसंग येतात.त्यामुळे ठेकेदार संस्थेस भा.द.वि.कलम नं.३५३ प्रमाणे अशा स्वरूपाच्या कलमांचा अधिकार देण्यात यावा.रस्ता बाजू फि वसूली करण्यास अडचण कमी होईल.तसेच काही ठिकाणी वसुली होत नसल्यास विक्रेत्यांच्या मालाची जप्ती करण्याचे अधिकार दयावेत. वीटा ,वाळू,खडी,विक्रेते,भंगार मालाचे विक्रेते, रस्त्यावर व्यवसाय करतात,त्यांचे कडून रस्ता बाजु फि वसुल मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली चालू करून दयावी.ा

सणासुदीच्या काळामध्ये रस्त्यांवर मोठया प्रमाणात स्टॉल लावण्यात येतात.उदा.गणपती,राखी स्टॅल,पतंग स्टॉल,फटाके स्टॉल,खेळणी स्टॅल,पुजा साहीत्य स्टॉल,स्टॅल असे अनेक प्रकारचे स्टॉल वर्षभरामध्ये लावण्यात येतात.वरील स्टॉल जर रस्त्याच्या बाजुस लागत असतात.त्यांची वसुली ही रस्ता बाजु फि मध्ये ठेकेदारामार्फत करणे बाबत आदेश व्हावेत.मनपाच्या रस्त्याच्या बाजुस अनेक टप-या बंद आहेत.रस्त्याच्या कडेला बंद टप-यांमुळे वसुली होत नसल्याने उत्पन्नात घट येते.या करीता या बाबत अतिक्रमणे विभागाकडे तक्रारी केल्यास तात्काळ या टप-या काढण्यात याव्यात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- खाजगी बाजारतील वसुली बाबत निविदाधारकांस रस्ता बाजु फि वसुली करण्याची परवानगी देण्यात येत आहे.या कामी वसुली न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी कार्यवाही करण्यात यावी.कार्यवाही केल्यानंतर देखील वसुली झाली नाही तर त्या प्रमाणात दर आठवडयास आढावा घेवून मनपाने तेवढया रकमेची नुकसान भरपाई ठेकेदार संस्थेकडून देकार रकमेत सुधारणा करून रक्कम स्वीकारण्यास मान्यता देण्यात यावी.

ठेकेदारच्या तक्रारी नुसार शहरामध्ये दुचाकी व चार चाकी जुने वाहनविक्रेते दुचाकी व चार चाकी वाहनांवर सेल असा फलक लावून विक्री करीता वहाने उभी करून ठेवतात.ते महानगरपालिकेच्या जागेमध्ये व्यवसाय करत असून त्यांचे कडून निविदेमध्ये नमुद असलेल्या दरा नुसार जागेची फि वसुल करणेस परवानगी देण्यत यावी.या वसुली बाबत अडचणी येत असल्याने ठेकेदार संस्थेस भा.द.वि.कलम नं.३५३ प्रमाणे अधिकार देण्यात यावेत. काही ठिकाणी रस्ता बाजु वसुली होत नसल्यास विक्रेत्यांच्या मालाची जप्ती करण्याचे अधिकार दयावेत. सणासुदीच्या काळामध्ये रस्त्यांवर मोठया प्रमाणात स्टॉल लावण्यात येतात.या स्टॅालची रस्ता बाजु वसुली ठेकेदारामार्फत करण्यास परवानगी देण्यात यावी.रस्त्याच्या कडेच्या बंद टप-यांबाबत अतिक्रमणे विभागाकडे ठेकेदाराने तक्रार केल्यास तात्काळ या टप-या काढण्यात याव्यात. रस्ता बाजु फि वसुली ही सक्षम व अनुभवी ठेकेदार संस्थेसच काम देण्यात यावे.

मुदस्सर शेख :- अतिक्रमण मोहीम सलग तीन चार दिवस मोहिम चालल्यास आपल्याला नुकसान भरपाई देता येणार नाही,परंतु त्या पेक्षा जादा दिवस मोहिम राबविल्यास त्याची भरपाई किंवा त्या दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी.तसेच मटन विक्री व वीटा ,वाळू,खडी,विक्रेते,भंगार मालाचे विक्रेते, रस्त्यावर व्यवसाय करतात,त्यांचे कडून रस्ता बाजु फि मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली चालू करून दयावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॅाटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ठेकेदारानं उपस्थीत केलेल्या मुद्दे व सभेमध्ये झालेली चर्चा या नुसार खाजगी बाजारतील वसुली बाबत निविदाधारकांस रस्ता बाजु फि वसुली करण्याची नियमानुसार परवानगी असून ,या कामी वसुली न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी कार्यवाही करण्यात यावी.कार्यवाही केल्यानंतर देखील वसुली झाली नाही तर त्या प्रमाणात दर आठवडयास आढावा घेवून मनपाने तेवढया रकमेची नुकसान भरपाई ठेकेदार संस्थेकडून देकार रकमेत सुधारणा करून रक्कम स्वीकारण्यास ही सभा मान्यता देत आहे.अतिक्रमण तीन चार दिवस मोहिम चालल्यास आपल्याला नुकसान भरपाई देता येणार नाही,परंतु त्या पेक्षा जादा दिवस मोहिम राबविल्यास त्याची भरपाई किंवा त्या दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी.तसेच मटन विक्री करणा-या दुकानदारांकडून मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली चालू करून दयावी. ठेकेदारच्या तक्रारी नुसार शहरामध्ये दुचाकी व चार चाकी जुने वाहनविक्रेते दुचाकी व चार चाकी वाहनांवर सेल असा फलक लावून विक्री करीता वहाने उभी करून ठेवतात.ते महानगरपालिकेच्या जागेमध्ये व्यवसाय करत असून त्यांचे कडून निविदेमध्ये नमुद असलेल्या दरा नुसार जागेची फि वसुल करणेस परवानगी देण्यत यावी.या वसुली बाबत अडचणी येत असल्याने ठेकेदार संस्थेस भा.द.वि.कलम नं.३५३ प्रमाणे अधिकार देण्यात यावेत. काही ठिकाणी रस्ता बाजु वसुली होत नसल्यास विक्रेत्यांच्या मालाची जप्ती करण्याचे अधिकार दयावेत. सणासुदीच्या काळामध्ये रस्त्यांवर मोठया प्रमाणात स्टॅल लावण्यात येतात.या स्टॅलची रस्ता बाजु वसुली ठेकेदारामार्फत करण्यास परवानगी देण्यात यावी.रस्त्याच्या कडेच्या बंद टप-यांबाबत अतिक्रमणे विभागाकडे ठेकेदाराने तक्रार केल्यास तात्काळ या टप-या काढण्यात याव्यात. मटन विक्री व वीटा ,वाळू,खडी,विक्रेते,भंगार मालाचे विक्रेते, रस्त्यावर व्यवसाय करतात,त्यांचे कडून रस्ता बाजु फि मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली चालू करून दयावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका ई निविदा क्र.१५०० मधील अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर देणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार, खाजगी बाजारतील वसुली बाबत निविदाधारकांस रस्ता बाजु फि वसुली करण्याची परवानगी देण्यात येत आहे.या कामी वसुली न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी कार्यवाही करण्यात यावी.कार्यवाही केल्यानंतर देखील वसुली झाली नाही तर त्या प्रमाणात दर आठवडयास आढावा घेवून मनपाने तेवढया रकमेची नुकसान भरपाई ठेकेदार संस्थेकडून देकार रकमेत सुधारणा करून रक्कम स्वीकारण्यात यावी.अतिक्रमण मोहिम तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस राबविल्यास त्याची भरपाई वरील प्रमाणे आढावा घेवून करावी.किंवा त्या दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी.तसेच मटन विक्री करणा-या दुकानदारांकडून मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली करून द्यावी.तसेच रस्ता बाजू ठेका हा मनपाचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे.यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदार संस्थेसच काम देण्यात यावे.शहरामध्ये दुचाकी व चारचाकी जुने वाहनविक्रेते वाहने रस्त्यावर मनपाच्या जागेवर उभी करून ठेवतात.ते मनपाच्या जागेमध्ये व्यवसाय करीत असून त्यांचेकडून निविदेमध्ये नमुद असलेल्या दरानुसार जागेची फी वसुल करणेस ठेकेदारास परवानगी देण्यात यावी.या वसुलीबाबत अडचणी येत असल्यास ठेकेदार संस्थेस भा.दं.वि.कलम ३५३ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यासाठी अधिकार देण्यात यावेत.काही ठिकाणी रस्ता बाजू वसुली होत नसल्यास विक्रेत्यांच्या माल जप्ती करण्याचे अधिकार द्यावेत.सणासुदीच्या काळामध्ये रस्त्यांवर मोठया प्रमाणात स्टॉल लावण्यात येतात.अशा स्टॉल्सची अतिक्रमण विभागामार्फत परवाना देतानाच मांडव भाडे सहीत व्यवसाय करणा-या विक्रेत्याकडून रस्ता बाजू फी एकत्रित वसूल करण्यात यावी व ती रस्ता बाजू ठेकेदाराच्या रकमेतून वजा करण्यात यावी अथवा रस्ता बाजू वसुली ठेकेदारामार्फत करण्यास परवानगी देण्यात यावी.रस्त्याच्या कडेच्या बंद टप-यांबाबत निविदाधारका कडून माहिती घेवून अतिक्रमण विभागाने या टप-या त्वरीत काढण्याची कारवाई करावी. मटन विक्री व विटा,वाळू,खडी विक्रेते,भंगार मालाचे विक्रेते हे खाजगी जागेवर व्यवसाय करीत असले तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार त्यांचे मालमत्तेस आकारणी झालेली नसल्यास व त्यांचा माल दुकानापुढे रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी असल्यास त्यांच्याकडून रस्ताबाजू फी मार्केट विभाग प्रमुख यांनी कायदेशीर कारवाई करून ठेकेदार संस्थेस वसुली करीता स्वतंत्र्य आदेश दयावेत.रस्ता बाजू फी वसुली ठेक्यामार्फत मनपास उत्पन्न होत असल्याने वरील ठरावात नमुद सूचनेनुसार मार्केट विभाग,प्रभाग समित्या,अतिक्रमण विभाग यांनी सात दिवसांत आवश्यक ती कारवाई पुर्ण करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सही /-

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२

विषय क्रमांक- १५ शनिवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** ई निविदा क्र.१४८३ मधील **ए)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कमेतुन रस्त्याचे पॅचिंग करणे **बी)**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे **सी)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील शहर व उपनगरभागातील रस्त्याचे पॅचिंग करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त यांची दि.२२/१२/२०१६

२] ऑनलाईन ई- निविदा क्र. १४८३/ सन २०१६-१७

३] निविदा विक्री कालावधी :- दि.०३/०१/२०१७ ते दि.२७/०१/२०१७ (दुस-या मुदतवाढ नुसार)

४] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.३०/०१/२०१७ ते दि.०१/०२/२०१७

५] निविदा उघडण्याची तारीख :- दि.१०/०३/२०१७

६] कामाची मुदत :- ८ महिने

७] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १४८३ | ए) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयडिया सेल्युलर पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रकमेतुन रस्त्याचे पॅचींग करणे. रक्कम रू. २३,२०,६२२/-<br>बी ) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खोदाई चे डांबरीकरणाचे पॅचींग करणे रक्कम रूपये ४०,७५,७८३/-<br>सी ) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्यांचे पॅचींग करणे रक्कम रूपये १,३२,००,०००/- | १९५९६४०५ | श्री.ए.जी.वाबळे | ०.९९९९९९९९९९९९९९% कमी दराने | श्री.राजेंद्र जाधव २.४१% कमी दराने |
| | | | मे.ए.सी.शेख | ०.९९% कमी दराने | |
| | | | श्री.राजेंद्र जाधव | २.४१% कमी दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक **श्री.राजेंद्र जाधव** यांची निविदा स्पर्धात्मक दृष्ट्या कमी दराची म्हणजेच निविदा दरापेक्षा **२.४१% कमी दराने** असुन ती वाजवी वाटत असल्याने **श्री.राजेंद्र जाधव** यांची **२.४१% कमी दराची** निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

तथपि मा.स्थायी समिती विषय क्र.१२२ दि.१६/०२/२०१७ चे पॅचींगचे पुनर्विलोकनाचे प्रस्तावास मान्यता दिलेनुसार निविदा खालील प्रमाणे कार्यवाहीस.

ए) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रकमेतुन रस्त्याचे पॅचींग करणे.- रक्कम रु.23,20,622/-
बी) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खोदाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे. - रक्कम रु.40,75,783/- सी) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचींग करणे. <u>रक्कम रु.1,32,00,000/-</u> एकुण रक्कम रु.1,95,96,405/-

परंतु प्रत्यक्षात आयडीया सेल्युलर लि.चे खर्चापोटी रु.१२८.०० लक्ष रक्कम भरलेली आहे. त्यामुळे आयडीया सेल्युलर लि.व इतर पॅचींग मिळुन रु.२३,२०,६२२/- + रु.१,३२,००,०००/- = एकुण रक्कम रु.१,५५,२०,६२२/- इतक्या रकमेचीच निविदा प्रथम मान्य करणे योग्य.तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला रु.१,६६,५७,५००/- इतकी रक्कम खोदाईकरीता भरणेस कळविली आहे.परंतु अद्याप सदरची रक्कम इकडेस भरणा केलेली नाही.व महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने दिलेल्या पत्रानुसार सदरची रक्कम भरण्याची त्यांची मनस्थिती नसुन ती माफ करण्यासाठी प्रयत्न चालु आहेत.त्यामुळे जोपर्यंत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे खोदाईची रक्कम भरण्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत रु.४०,७५,७८३/- वजा करुन उर्वरित रु.१,५५,२०,६२२/- इतक्या रकमेचाच कार्यारंभ आदेश देणेस परवानगी देणे योग्य व उर्वरित रु.४०,७५,७८३/- चा कार्यारंभ आदेश महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने प्रत्यक्ष रक्कम भरल्यानंतरच कार्यारंभ आदेश देणे योग्य.

तसेच सदर निविदेच्या एकुण रक्कम रु.२५.०० लक्ष पेक्षा जादा असल्याने निविदा मंजुरीकरीता मा.स्थायी समितीसमोर सादर असलेने मा.स्थायी समितीमध्ये निर्णय घेवुन कार्यारंभ आदेश देण्यास काही कालावधी लागणार असल्याने दि.३१/०३/२०१७ पुर्वी काम होणे अशक्य आहे त्यामुळे सदरचा खर्च पुढील आर्थिक वर्षात म्हणजे सन.२०१७-१८ या वर्षात पडणार आहे.त्यामुळे सन.२०१७-१८ ची रस्ते पॅचींग या लेखाशिर्षची तरतुद रु.१५०.०० लक्ष चालु आर्थिक वर्षाकरीता + मागील देयकाकरीता रु.१९५.०० लक्ष अशी एकुण रक्कम रु.३४५.०० लक्ष तरतुद करावी लागणार आहे त्यामुळे सदरचा विषय मा.महापौर यांना कळविणेस व निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस सविनय सादर.

तसेच सोबत मा.नगरसेवकांचे मागणीचे पत्र व रस्त्याचे प्राधान्य क्रमांची यादी जोडत आहे.
सोबत : प्राधान्यक्रमांची यादी, नागरिकांची पत्रे व मा.नगरसेवकांची यादी खालील प्रमाणे तसेच वर्तमान पत्रातील बातमी कात्रण जोडले आहे.

१) मा.सौ.रुपालीताई निखील वारे, नगरसेविका यांची यादी दि.१३/०३/२०१५ व दि.०६/१२/२०१६,
२) मा.सौ.शारदाताई दिगंबर ढवण, नगरसेविका यांची यादी दि.२७/०७/२०१५ व दि.०७/१०/२०१५,
३) मा.श्रीपाद शंकर छिंदम,उपमहापौर यांची यादी जा.क्र.६८दि.०३/०९/२०१६व जा.क्र.७६ दि.१४/०९/२०१६,
४) मा.श्री.विजय नाना गव्हाळे, नगरसेविक यांची यादी दि.२६/०९/२०१६,
५) मा.सौ.आशाबाई सुभाष पवार, नगरसेविका यांची यादी दि.२६/०९/२०१६,
६) मा.सौ.सविता अशोक कराळे, नगरसेविका यांची यादी दि.०४/११/२०१६,
७) मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर, नगरसेवक यांची यादी दि.०५/११/२०१६,
८) मा.सौ.सुवर्णाताई दत्ता जाधव, नगरसेविका यांची यादी दि.२२/१२/२०१६,
९)मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,नगरसेवकयांची यादी दि.०७/१२/२०१६,दि.२६/१२/२०१६व दि.०५/०१/२०१७
१०) मा.श्री.सुवेंद्र गांधी, नगरसेवक यांची यादी दि.२९/१२/२०१६,
११)मा.श्री.कुमार वाकळे,नगरसेवक यांची यादी जा.क्र.१३२९,१३३० व १३३१ दि.०५/०१/२०१७, दि.२३/०३/२०१७
१२) मा.श्री.संपत विजय बारस्कर, नगरसेवक यांची दि.२३/०३/२०१७
१३) मानद सचिव, दि.अहमदनगर आडते बाजार मर्चंट्स असो.आडते बाजार यांचे पत्र दि.१४/०९/२०१६

तसेच सोबत प्राधान्य क्रमांची यादी मान्यतेस्तव सविनय सादर.

तसेच उपरोक्त निविदेमध्ये निविदा कार्यादेशापुर्वीचे खराब झालेले सोबतच्या यादीतील प्राधान्यते क्रमाने रस्ते प्रस्तावित आहे.परंतु पाणी पुरवठा विभागामार्फत फेज - २ किंवा देखभाल दुरुस्ती करिता होणारीओ किंवा तत्सम इतर खोदाई केल्यानंतर करावयाची पॅचींगची तरतुद उपरोक्त निविदेमध्ये नाही.उपरोक्त सदर पाणी पुरवठा किंवा तस्तम खोदाईमुळे सदर ठेकेदारामार्फत रस्ते पुर्ववत होत नसलेने नागरिकांचा रोष निर्माण होत आहे.त्यामुळे पाणी पुरवठा व तत्सम खोदाई करणेपुर्वी त्याकाड़णे किमान खोदलेला पक्का रस्ता जोपर्यंत पॅचींग होवुन पुर्ववत होत नाही तोपर्यंत लाईन टाकणेकरिता खोदाई करु नये किंवा झाल्यास बांधकाम विभाग जबाबदार राहआणार नाही.त्यामुळे सदर पॅचींग बाबत देखील निर्णय होणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.त्याकरीता पाणी पुरवठा ठेकेदारास पॅचींगची जादा बाब करुन दिल्यास संबंधित ठेकेदार खोदाई व पॅचींग असे एकत्रित नियोजन व्यवस्थीत होईल.

तरी वरीलप्रमाणे रिपोर्ट निविदा मंजुरीसह मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.२१/०४/२०१७रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियांता यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,१.कनिष्ठ अभियंता व मा.शहर अभियंता यांचे अहवालानुसार प्रस्तावित अ ,ब,क,कार्यवाही करणेस हरकत नाही.तसेच प्रस्तावित कामांच्या यादीमध्ये फेज - २ ची कामे समाविष्ट असल्यास पा.पु.प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य ठरेल.

२.तसेच सां.बा.वि.यांचे शासन निर्णय दि.१२/०२/१६ प्रमाणे मा.शहर अभियंता यांनी ----- करण्याच्या अधिन राहून कार्यवाही करणे योग्य ठरेल.

कार्यारंभ आदेशापुर्वी वरील पा.पु.विभागाचे अभिप्राय घेणे संयुक्तीक राहिल.तसेच सा बा नि शा नि दि.१२ एप्रिल २०१७ पुर्तता खात्री करून पुढील कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,नमुद 'क' प्रमाणे पा.पु.विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घेणे योग्य त्यांनी त्याचे अवलोकन करणे बाबत सहमतीदर्शक स्वाक्षरी घेणेत यावी.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,पाणी पुरवठा विभागाकडे पॅचिंग करणे कामी स्वतंत्र्य यंत्रणा नाही.तसेच फेज-२ च्या निविदेमध्ये देखील पॅचिंग करणे बाबतचा समावेश केलेला नाही.

दैनंदिन अत्यावश्यक खोदाईची कामे करणे गरजेचे असते,कामे करत असतांना किंवा कामे झाले नंतर खोदाई झालेले ठिकाणे बांधकाम विभागास अवगत करणे बाबत कार्यवाही करणेत येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी

यावर मा.अतिरीक्त आयुक्त तथा प्र.आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त फेरसादर अहवालानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिति सभा क्र - २ शनिवार दि.०३/०६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृहात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली असता.सदरची सभा कोरम अभावी तहकुब करण्यात आली. सदरची सभा मंगळवार दि.६/६/२०१७ रोजी दुपारी ३ .०० होईल असे मा.सभापती साहेब यांनी घोषीत केले.मंगळवार दि.६/६/२०१७ रोजी होणा-या सभेमध्ये सार्व.बांधकाम विभागास पॅचिंग करणे बाबत शहर व उपनगरामध्ये मा.नगरसेवकांच्या मागणीचे पत्र प्राप्त झाल्यास सादर करणे बाबत सुचित करण्यात आले.

मा.फेर सादर,

विषय : रस्ते दुरुस्ती पॅचींग सन.२०१६-१७अंतर्गत ई -निविदा क्र.१४८३ या निविदेच्या मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, विषयांकीत कामाची ई निविदा क्र.१४८३ निविदा मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.२१/०४/२०१७ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव इकडील जा.क्र.सा.बां.वि.२५१ दि.२७/०४/२०१७ अन्वये मा.नगरसेवकांचे मागणीचे पत्रासह पाठविला असता सदरचा प्रस्ताव दि.०३/०६/२०१७ रोजी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आला असता सदरची सभा तहकुब झाली होती. तथापि दि.०६/०६/२०१७ रोजी दुपारी ३ :०० वा.होणा-या सभेत शहर व उपनगरीतील पॅचींग करणेबाबत मा.सभापती, स्थायी समिती यांनी आणखी काही मा.नगरसेवक यांच्या मागणीचे पत्रे प्राप्त झाल्यास ती सादर करणेस सुचित केलेनुसार खालील नमुद प्रमाणे मा.नगरसेवकांचे मागणीचे पत्र जोडत आहेत.

१) मा.श्री.सचिन तुकाराम जाधव, सभापती, स्थायी समिती,यांची यादी दि.०५/०६/२०१५
२) मा.सौ.मालनताई सुरेशराव ढोणे,उपसभापती,महीला व बालकल्याण समिती,यांची यादी दि.०५/०६/२०१७
३) सौ.फुलसौदर सुनिता भगवान, नगरसेविका यांची यादी दि.३०/०५/२०१५
४) मा.श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे, नगरसेवक यांची यादी दि.०५/०६/२०१७
५) मा.श्री.शेख मुदस्सर जहॉगीर, नगरसेवक यांची यादी दि.०५/०६/२०१७
६) मा.श्री.शेख नजीर अहमद अ.रज्जाक, नगरसेवक यांची यादी दि.०५/०६/२०१७ तसेच
७) दि.२६/०५/२०१७ रोजी मा.महापौर यांचे दालनात आयोजित केलेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार " बुरुडगांव रोड, कचरा डेपोकडे जाणा-या रस्त्याचे पॅचींग करणे "
८) मा.उपमहापौर, मनपा.अहमदनगर यांची दि.०५/०६/२०१७ रोजीची यादी.

सन.२०१६-१७ आयडीया सेल्युलर लि. पुणे चे खर्चापोटी रक्कम रु.१,२८,००,०००/-
+ महाराष्ट्र विज वितरण कंपनीचे रु.१,६६,५७,५००/-
एकुण रु.२,९४,५७,५००/-

लक्ष रकमेचे नियोजन करण्यात आलेले होते.त्यापैकी रु.१,९५,९६,४०५/- रकमेची जी निविदा काढली त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

ए ) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयडिया सेल्युलटर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रकमेतून रस्त्यांचे पॅपींग करणे. रक्कम रू. २३,२०,६२२/- बी ) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खोदाईचे डांबरीकरणाचे पॅपींग करणे. रक्कम रू.४०,७५,७८३/- सी ) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचींग करणे. रक्कम रू.१ ,३२,००,०००/-एकुण रक्कम रू. १,९५,९६,४०५/-

वरील नमुद प्रमाणे एकुण रक्कम रु.१,९५,९६,४०५/- इतक्या रकमेची ई निविदा क्र.१४८३ काढण्यात आली होती.ती सन.२०१६-१७ मध्ये मंजुर न झाल्यामुळे त्या निविदेची मंजुरी सन.२०१७-१८ मध्ये होणार आहे.महाराष्ट्र विज वितरण कंपनीने अद्याप रक्कम रु.१,६६,५७,५००/- न भरल्यामुळे खालील प्रमाणे तरतुद करुन मिळावी.

आयडिया सेल्युलर लि. पुणे या कंपनीने रस्ता खोदाई पोटी पॅचींग करणे. रक्कम रू.२३,२०,६२२/- व शहरातील इतर पॅचींग करणेसाठी रक्कम रु.७३,००,०००/- लक्ष बजेट तरतुदीनुसार रक्कम प्राधान्यक्रमाणे उपलब्ध करुन मिळावी.सदर रकमएच्या मंजुरी नंतर व प्राधान्यक्रमाणे मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या रकमेस कार्यारंभ आदेश देता येईल करीता सदरचा अहवाल निविदा मंजुरीसह मा.स्थायी समितीकडे अवलोकनार्थ पाठविणेस सविनय फेर सादर.

सोबत : वरील नमुद याद्या.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई निविदा क्र.१४८३ मधील **ए)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कमेतुन रस्त्याचे पॅचिंग करणे **बी)**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे **सी)** अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील शहर व उपनगरभागातील रस्त्याचे पॅचिंग करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आयडीया सेल्युलर या कंपनीने आपल्याकडे पैसे आले का?जर आपल्याकडे पैसेच आले नाही तर निविदा कशी मंजूर करू शकतो.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मध्ये ए,बी,सी,डी,या प्रमाणे कशासाठी केले,कोणकोणत्या कंपनी चे पैसो आपल्याकडे जमा होणार होते.या बाबतची माहिती मा.शहर आभियंता यांनी दयावी.

मा.शहर अभियंता :- सन २०१६ साठी ए) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रकमेतुन रस्त्याचे पॅचींग करणे. रक्कम रु.23,20,622/- बी) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या



भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खोदाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे.रक्कम रु.40,75,783/-सी) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचींग करणे. रक्कम रु.1,32,00,000/- एकुण रक्कम रु.1,95,96,405/- ची निविदा आपण काढलेली आहे.

मा.सभापती साहेब :- या मध्ये आपण ए मध्ये किती रक्कमेची व सी मध्ये किती रक्कमेची निविदा आहे.

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- ए मध्ये २३,२०,६२२/- बी मध्ये ४०,७५,७८३/-

मा.सभापती साहेब :- बी मधील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे पैसे आपल्याकडे जमा झाले आहेत का?

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- आपल्या कडे पैसे प्राप्त झाले नाहीत.

मा.सभापती साहेब :- सी मध्ये काय आहे.

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- पैसे जमा होतील याधर्तीवरच निविदा काढण्यात आल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- हे पैसे आपल्याकडे जमा झाले आहे का?

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- फक्त आयडीया कंपनीचे पैसे आपल्याकडे जमा झालेले आहे.इतर पैसे आपल्याकडे जमा झालेले नाहीत.

मा.सभापती साहेब :- फक्त आयडीया कंपनीचे जे रू.२३,२०,६२२/- आपल्या कडे आहेत.इतर कामा करीता ऑफिस रिपोर्ट मध्ये उल्लेख नाही पैसे इतर कशातुन टाकणार आहे. बी) अहमदनगर महानगरपालिका

हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खोदाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे.रक्कम रु.40,75,783/-सी) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचींग करणे. रक्कम रु.1,32,00,000/- एकुण रक्कम रु.1,95,96,405/- या करीता आपल्या कडे पैसे आपल्या कडे आलेले आहे का?

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- आपल्या कडे पैसे अदयाप प्राप्त झालेले नाही.

मा.सभापती साहेब :- आपल्या कडे जर पैसे उपलब्ध झालेले नाही तर आपण निविदा कशा काढू शकतो.समजा आपल्या कडे आयडीया सेल्युलर चे पैसे आलेले आहेत.परंतु बी आणि सी करीता आपल्या कडे पैसे आहेत का?आपल्या कडे पैसे नसतील मनपा निधी मधून कामे करणार असा कोठे काही उल्लेख नाही

मा.सौ.सुनिता भिंगारदिवे :- नगर शहरामध्ये कोठेही पॅचिंग झाल्याचे दिसून येत नाही.माळीवाडा ते दिल्ली गेट रस्त्याचे खड्डे आहे तसेच आहेत.नगर शहर रस्त्यावर खड्डे आहेत की खड्यावर रस्ता हे सुध्दा कळत नाही.ज्या ठेकेदाराने पॅचिंग केले त्याला बोलावून चौकशी करण्यात यावी.या पुर्वी ७० लाखांचे कोठे कोठे पॅचिंग झाले ते सांगा.

मा.बाळासाहेब बोराटे :- ७० लाखाला आपण मंजूरी दिली आहे.

मा.सभापती साहेब :- याची यादी आहे का आपल्या कडे ?

बाळासाहब बोराटे :- ७० लाखाचे जे पॅचिंग चे काम केले त्याची माहिती दया.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- ती फाईल वेगळी आहे.त्या कामाची यादी तयार आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- काम १६-१७ मध्ये केले कि१७-१८ मध्ये,कुठे -कुठे पॅचिंग केले,पॅचिंग गेले कोठे.

मा.सभापती साहेब :- हि जी तरतुद केलेली आहे ही कोणत्या वर्षाची आहे.

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- सन २०१६-१७ या वर्षाची आहे.

मा.सभापती साहेब :- चालू कोणते वर्ष आहे.

मा.शहर अभियंता श्री.रजपुत :- सन २०१७-२०१८

मा.सभापती साहेब :- मग आपण मंजूरी कशी देवू शकतो.आत्तापर्यत ज्या निविदा झाल्यात,त्याचे जर बजेट हेड असेल,ती खतावली असेल,तरच तुम्ही पुढे फाईल नेता.

सान १६-१७ मध्ये काम कले आपण, ही जी केलेली आहे आपण ही कधीची आहे.सध्या चालू कोणते वर्ष आहे.मग आपण कशी मंजूरी देवू शकतो.आपल्या कडे बजेट नुसार प्रस्ताव सादर केले जातात.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- चालू आर्थिक वर्षा मध्ये रस्ते पॅचिंग साठी बजेट तरतुद असणारच आहे

मा.बाळासाहेब बोराटे :- सन २०१६-१७ मध्ये किती रक्कमेचे टेंडर निघाले होते.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- ७० लाख रु.

मा.बाळासाहेब बोराटे :- तेव्हढे एकच निघाले होते का.काम झालं आहे का,सर्जेपुराचे जे बी.बी.एम.केले तेथे जावून पहाणी करायला गेलो ,फोटो काढले.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- ते काम झाले नाही,बील सुध्दा झालेले नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मग ते काम करायचे नाही का.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- तो ठेकेदार काम करीत नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोण ठेकेदार आहे तो.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- तोच ठेकेदार आहे.

मा.सौ.सुनिता भिंगारदिवे :- या ठेकेदाराला काळया यादीत टाका.

मा.सभापती साहेब :- त्या ठिकाणी जी खडी टाकण्यात आली होती ती खडी सुध्दा निघून गेली आहे.त्यावर डांबरीकरण करणे आवश्यक होते.पॅचिंग ठेकेदाराचे देयके बी.बी.एम.वर डांबरीकरणाचे कारपेट एकत्रीत पुर्ण झाल्या नंतरच बील करावे.कोणत्याही परिस्थीती मध्ये फक्त बी.बी.एम.स्वरूपाचे अर्धवट देकय ,धावते देयक तयार करू नये.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- सदर ठेकेदाराला तीन नोटिसा दिल्या आहेत.,तोंडी संपर्क साधला परंतु काम करीत नाही.

मा.सभापती साहेब :- मनपा फंडातील कामाचे आपण समजु शकतो बील निघत नाही,ठेकेदाराला काय अडचण आहे.हे तर कॅश पैसे आहेत.ती जी निविदा झालेली आहे २३ लाखाची ते पैसे आहेत मग तो काम का करीता नाही.सदर काम पावसाळयाच्या अगोदर होणे अपेक्षीत होते.२३ लाखाचे बील काढले आहे का.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- नाही बील तयारच केलेले नाही.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराचे म्हणणे काय आहे .काम करणार आहे की,नाही करणार ते विचारून घ्या.नाहीतर ती सुध्दा फेर निविदा काढा.

मा.सौ.सुनिता भिंगारदिवे :- स्पष्ट विचारून घ्या, येथे स्थायी समितीमध्ये त्या ठेकेदाराला बोलवा.

मा.सभापती साहेब :- त्याला शेवटची नोटिस दया.नाहितर या कामाची निविदा काढा.बी.बी.एम.केल्यानंतर कारपेट केल्याशिवाय पैसे काढू नका.बी.बी.एम.चे बील वेगळे कारपेटचे पैसे वेगळे,बी.बी.एम.केल्या नंतर पाउस आल्या नंतर ते वाहून जोते.ठेकेदाराला माहित आहे.बी.बी.एम. केले तरी पैसे निघात नाहि केले तरी पैसे निघतात.पॅचिंगच्या कामाची संपूर्ण यादी दया,पुढील प्रस्तावात नमुद करावी.

मा.बाळासाहेब बोराटे :- सीटी इंजी.ही तुमची जबाबदार आहे.फक्त इंजिनीयरची जबादारी नाही.संपुर्ण माहिती पुढच्या सभेमध्ये आम्हाला दया.

मा.सभापती साहेब :- या कामाची निविदा आम्हाला वाचायला दया त्या निविदेमध्ये काय होते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे:- कोट दिड कोट रू.नगरशहरामधील सर्व रस्ते पॅचिंग चांगलया पध्दतीने हावू शकते.

मा.सभापती साहेब :- भर पावसाळया निविदा मंजूर करणार.पावसाळया मध्ये रस्त्याचे का करता येते का. ज्या तरतुदीमध्ये आपण निविदा प्रसिध्द केली ती तरतुद का?

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- हा प्रस्ताव ऑगस्ट २०१६ मध्ये काही कारणाने निविदा झाली नाही.

मा.सभापती साहेब :- ए,बी,सी,डी हे कशासाठी केले हे मला सांगता येणार नाही.जे पैसे आपल्या कडे प्राप्त झाले आहे व जे पैसे आपल्याकडे येतील त्या रक्कमेची निविदा काढा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आयडीयाचे काम झाले आहे का?

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- काम नाही झाले अदयाप.

मा.बाळासाहेब बोराटे :- एम.एस.ई.बी.चे रस्ता खोदाई चे काम झाले का भुमीगत केबल टाकण्याचे.यांचे टेंडर पण लगेच काढले . आयडीया,एम.एस.ई .बी.ज्या ठिकाणी खोदाई करतील तेथेच पैसे वापरायचे आहे.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- आयडीया कंपनीचे २३ लाख आले. परंतु एम.एस.ई .बी चे पैसेच आपल्या कडे आलेले नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ते काम आधी होवू दया.

मा.सभापती साहेब :- काम झाल्या नंतर जे जास्तीचे पैसे आहे त्यातुन काम कारणार आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- हा जो विषय आहे,या विषयाची निविदा प्रक्रिया होत होत सध्या पावसाळा आला आहे.आयडिया कंपनी चे पैसे आपल्या कडे प्राप्त झाले आसून बाकीच्या दोन बाबींचे पैसे आपल्या कडे नाहीत.आता स्थायी समिती समोर जो विषय आहे.आज निविदा प्रक्रिया पुर्ण होवून जुन मध्ये याची वर्कऑर्डर देणे आवश्यक आहे.परंतु मा.सदस्यांनी जे प्रश्न मांडले,पॅचिंग करणे डांबराने करणे सध्या

शक्य होणार नाही,हॉटमिक्स चे पॅन्ट माझ्या माहितीप्रमाणे बंद झालेले असणार आहे,कोल्ड मिक्स ने ते काम करावे लागेल,तसे आपल्याला शहरातले जे खराब झालेले रस्ते आहेत,त्या अनुशंगाने आपल्याला काय करता येईल याचे उत्तर तुम्ही दया.

मा.सभापती साहेब :- आमचे तेच म्हणणे आहे,हे २०१६-१७ मधील होते,आता २०१७-१८मध्ये आपल्याल पैसे आलेले नाहित,पैसे आल्यानंतर ज्या कामासाठी पैसे आले त्याच ठिकाणी आपल्याला पॅचिंग करावे लागेल,मग जे उर्वरित पैसे असतील तर ते आपण दुसरीकडे वापरू शकतो,आत्ता जर या निविदेला आपण मंजूरी दिली,१ कोटी ३२ लाख खर्च झाले,हे पैसे आणयचे कोठून.

मा.बाळासाहेब बोराटै :- साहेब आयडियाला व एम.एस.ई.बी.ला सुध्दा खड्डे खांदायला परवानगी देवू नका,पावसाळा चालू आहे.लोकांच्या दारत खड्डे करू नका,काही गरज नाही इतक्या दिवस थांबलो आहे,आणखी चार महिने थांबा.

मा.सभापती साहेब :- ही जी १४८३ ची निविदा आहे,ती ए,बी,सी,डी, अशी काढलेली आहे,त्यामध्ये आपण पार्ट ने मंजूरी देवू शकतो का? सर्व कामे एकाच निविदेमध्ये असल्याने फक्त आयडीया करीता मंजूरी देता येणार नसल्याने तुम्ही त्वरीत आयडीया किंवा आणखी् जे गरजेचे आहे,सध्या शहरात पॅचिंग इतके महत्वाचे आहे,सर्व सदस्यांचे पत्र प्राप्त झालेले आहे.त्यानुसार प्राधान्य क्रमाने कामे करण्यात यावी.

मा.बाळासाहेब बोराटे :- फक्त निविदा काढू नका, मागील सत्तर लाखांचे कुठे कुठे पॅचिंग केले हे लोकांपुढे येवू दया,या कामाची यादी दया.

मा.सभापती साहेब :- सगळयात महत्वाचा विषय काय आहे,या अगोदर आपण २३ लाखाची निविदा काढली,ती कोणी मंजूर केली?

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- मा.आयुक्त साहेबांनी.

मा.सभापती साहेब :- २३ लाखाची स्वतंत्र्य यामध्ये का घेतली? २३ लाखाची स्वतंत्र्य निविदा काढली असती तर हा विषय आला असता का?एम.एस.ई.बी.चे पैसे आलेले नाहित,तो विषय तेथे क्लोज झाला असता,पण हे २३ लाखाचे काम चालू झाले असते.

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- बांधकाम विभागचे टेंडर विभागात टेंडर चे काम संथगतीने होत आहे.

मा.सभापती साहेब :- त्यांचे म्हणणे बरोबर आहे,जे कर्मचारी फास्ट काम करतील असे कर्मचारी या विभागाकडे दया, आयडीया ज्या ठिकाणी खोदकाम करील त्या ठिकाणी प्रधान्याने पॅचिंग करावे लागेल.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- ठेकेदाराला पैशाची गॅरंटी असल्याशिवाय काम करणार नाही,असे चर्चे वरून लक्षात येते,आत्ता आपल्या कडे प्राप्त आयडीयाचे पैसे आहेत,दोन दिवसांमध्ये जेथे पॅचवर्क करणे शक्य आहे.ज्या भागामध्ये खरोखरच आवश्यक आहे,त्याचा विचार करा.

मा.सभापती साहेब :- जे अत्यंत गरचेचे आहे,तातडीने पॅचिंग करणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- तुम्हाला पॅचवर्क करायचे म्हणजे नेमके काय करायचे?

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.नगरसेवक यांच्या मागणी नुसार यादया घेवून त्या प्रमाणे सदरच्या रस्त्याचे पॅचिंग करणार.

मा.बाळासाहेब बोराटे :- तुम्ही प्रस्तावामध्ये प्रस्तावित केलेले ठिकाणा मध्ये एखादया नगरसेवकाने इतर निधी मधील रस्त्याचे काम प्रस्तावित केले असेल,मग तुम्ही काय कारणार,ते पण काम,हे पण काम एकाच ठिकाणी दोन काम प्रस्तावित होतील.माझ्या वॉर्ड मधील रस्त्याचे काम मंजूर आहे,अशा ठिकाणी काय करणार

कनिष्ठ अभियंता श्री.निंबाळकर :- नाही अशा ठिकाणी काम करणार नाही.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- डुप्लीकेशन व्हायला नको,पॅचवर्क मध्ये असे रस्ते घ्यावेत जेथे कोणते ही रस्त्याचे काम मंजूर नाही.त्या रस्त्यांचे पॅचींग चे काम करणार आहे.

मा.सभापती साहेब :- बरोबर आहे,ज्या ठिकाणी रस्ते मंजूर आहे,त्या ठिकाणी रस्त्याचे काम त्वरीत सुरू करण्यात यावीत.म्हणजे पॅचींग वरील खर्च वाचणार आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- आमदार निधी ,खासदार निधी ,मनपा फंड एकाच रस्त्यावर अनेक निधी मधील कामे होतात.

मा.श्री.दिलीप सातपुते :- प्रशासनाने रस्तेपॅचींग करण्याचा सादर केलेला मुळप्रस्ताव रू.१९५ लक्षाचा आहे.परंतु प्रस्तावातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे करीता असलेली रक्कम अदयाप अप्राप्त आहे.यावर सभागृहात सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सादर केलेल्या फेरप्रस्तावानुसार शहर उपनगरातील मोठया प्रमाणावर नादुरूस्त झालेले रस्ते पॅचींग करणे मागविणेत आलेल्या कमी दराचे निविदे मध्ये अ+ ब+ क असे मिळुण १९५ लक्षा पैकी ब) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे.रक्कम रू.४०,७५,७८६/- वगळून उर्वरित रक्कमेस मान्यता देणेत यावी.

मा.श्री.मनोज दुलम :- प्रशासनाने सादर केलेल्या यादीमधील तातडीचे रस्त्यांचे पॅचींग करण्यास व शहर ,उपनगरांतील महत्वाचे रस्ते,गणपती विसर्जन मार्ग,नवरात्र उत्सव मार्ग,मोहरम मिरवणूक मार्ग इ.रस्त्यांचे नियोजन करून पॅचिंग करण्यास मान्यता देण्यात यावी.

भुमीगत केबल टाकणे साठी आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कम रू.१२८ लक्ष पैकी रक्कम रू.६८ लक्ष रस्ते खोदाई मधुन रस्ते करणे / दुरूस्त करणे या लेखाशीर्षातील मंजूर कामे पुर्ण करण्यासाठी वर्ग करण्यास ही सभा मान्यता देण्यात यावी.

या व्यतीरीक्त रस्त्याच्या पॅचींगच्या कामाचे नियोजन पुढील प्राप्त होणा-या रकमेतुन करणे करीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत. या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.२ दि.३/६/२०१७ रोजी आयोजीत करण्यात आली सदर सभा कोरम अभावी तहकुब करण्यात येवून सदरची सभा दि.६/६/२०१७ रोजी होणार असे जाहीर केले. तसेच मा.सभापती यांनी मा.शहर अभियांता यांना दिलेल्या आदेशा नुसार शहराच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांच्या पॅचिंगचा फेरप्रस्तावांचा अहवाल सभेमध्ये सादर करण्यात आला.

प्रशासनाने रस्तेपॅचींग करण्याचा सादर केलेला मुळप्रस्ताव रू.१९५ लक्षाचा आहे.परंतु प्रस्तावातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे करीता असलेली रक्कम अदयाप अप्राप्त आहे.यावर सभागृहात सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सादर केलेल्या फेरप्रस्तावानुसार शहर उपनगरातील मोठया प्रमाणावर नादुरूस्त झालेले रस्ते पॅचींग करणे मागविणेत आलेल्या कमी दराचे निविदे मध्ये अ+ ब+ क असे मिळुण १९५ लक्षा पैकी ब) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे.रक्कम रू.४०,७५,७८६/- वगळून उर्वरित रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या यादीमधील तातडीचे रस्त्यांचे पॅचींग करण्यास व शहर ,उपनगरांतील महत्वाचे रस्ते,गणपती विसर्जन मार्ग,नवरात्र उत्सव मार्ग,मोहरम मिरवणूक मार्ग इ.रस्त्यांचे नियोजन करून पॅचिंग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

भुमीगत केबल टाकणे साठी आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कम रू.१२८ लक्ष पैकी रक्कम रू.६८ लक्ष रस्ते खोदाई मधुन रस्ते करणे / दुरूस्त करणे या

लेखाशीर्षातील मंजूर कामे पुर्ण करण्यासाठी वर्ग करण्यास ही सभा मान्यता देत आहे.त्या नुसार लेखाविभागाने कार्यवाही करावी.

या व्यतीरीक्त रस्त्याच्या पॅचींगच्या कामाचे नियोजन पुढील प्राप्त होणा-या रकमेतुन करणे करीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत. या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची  कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी.खर्च मंजूर

**ठराव :-** मा.स्थायी समिति सभा क्र.२ दि.३/६/२०१७ रोजी आयोजीत करण्यात आली सदर सभा कोरम अभावी तहकुब करण्यात येवून सदरची सभा दि.६/६/२०१७ रोजी होणार असे जाहीर केले. तसेच मा.सभापती यांनी मा.शहर अभियांता यांना दिलेल्या आदेशा नुसार शहराच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांच्या पॅचिंगचा फेरप्रस्तावांचा अहवाल  सभेमध्ये सादर करण्यात आला.

प्रशासनाने रस्तेपॅचींग करण्याचा सादर केलेला मुळप्रस्ताव रू.१९५ लक्षाचा आहे.परंतु प्रस्तावातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भुमीगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचिंग करणे करीता असलेली रक्कम अदयाप अप्राप्त आहे.यावर सभागृहात सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सादर केलेल्या फेरप्रस्तावानुसार शहर उपनगरातील मोठया प्रमाणावर नादुरूस्त झालेले रस्ते पॅचींग करणे मागविणेत आलेल्या कमी दराचे निविदे मध्ये अ+ ब+ क असे मिळुण १९५ लक्षा पैकी ब) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला परवानगी दिलेल्या भूमिगत केबल टाकणे करीता केलेल्या रस्ता खादाईचे डांबरीकरणाचे पॅचींग करणे.रक्कम रू.४०,७५,७८६/-  वगळून उर्वरित रक्कमेस  मान्यता देणेत येत आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या यादीमधील तातडीचे रस्त्यांचे पॅचींग करण्यास व शहर ,उपनगरांतील महत्वाचे रस्ते,गणपती विसर्जन मार्ग,नवरात्र उत्सव मार्ग,मोहरम मिरवणूक मार्ग इ.रस्त्यांचे नियोजन करून पॅचिंग  करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

भुमीगत केबल टाकणे साठी आयडिया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करीता भरलेल्या रक्कम रू.१२८ लक्ष पैकी रक्कम रू.६८ लक्ष रस्ते खोदाई मधुन रस्ते करणे / दुरूस्त करणे  या लेखाशीर्षातील मंजूर कामे पुर्ण करण्यासाठी वर्ग करण्यास ही सभा मान्यता देत आहे.त्या नुसार लेखाविभागाने कार्यवाही करावी.

या व्यतीरीक्त रस्त्याच्या पॅचींगच्या कामाचे नियोजन पुढील प्राप्त होणा-या रकमेतुन करणे करीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत. या निविदे अंर्तगत प्रस्तावित केलेली कामे रितसर पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने देयक अदा करण्याची  कार्यवाही प्राधान्याने पार पाडावी. मा.शासनाने जी.एस.टी.बाबत जे आदेश काढले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यास  ही सभा मान्यता देत आहे.
खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते  सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम  सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १६ शनिवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन व स्टाफ नर्स यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिनयाकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :** रक्त संक्रमण अधिकारी, रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग २६७ दिनांक २३/ ०३ / २०१७ अन्वयेचा अहवाल.

उपरोक्त विषयान्वये की, रक्त संक्रमण अधिकारी, रक्तपेढी विभाग यांनी संदर्भिय प्रस्ताव सादर करुन रक्तपेढी विभागा करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स यापदांवर संबधितांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.२५/०४/२०१७ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत नमुद करुन सुचित केलेले आहे. सद्यस्थितीमध्ये आरोग्य विभाग यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. आरोग्य विभाग ७९४ दिनांक ०५ /१०/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स यापदी संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनेमणूक करणेस मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ९१ दिनांक १७ / १२ / २०१६ अन्वयेचा पारीत ठराव करुन मंजुरी देण्यात आलेली होती. त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये सदर पारीत मंजुर ठरावाच्या अनुषंगाने संबधितांची करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | सद्यस्थिती मधील सहा महिने पुर्न नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | ६७५१ १०/०२/२०१७ | २२/१०/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ ते २१/०४/२०१७ |
| २ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ११,०००/- | ६७५१ १०/०२/२०१७ | २२/१०/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ ते २१/०४/२०१७ |
| ३ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ११,०००/- | ६७५१ १०/०२/२०१७ | २२/१०/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ ते २१/०४/२०१७ |
| ४ | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ११,०००/- | ६७५१ १०/०२/२०१७ | २२/१०/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २२/१०/२०१६ ते २१/०४/२०१७ |

वरील संबधितांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक २२/०४/२०१७ पासुन समाप्त झालेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थिती मध्ये सुधारीत आकृतीबंधामधील रक्तपेढी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या लॅब टेक्निशियन, परिचारीका यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन तसेच नव्याने पदमंजुर संख्येनुसार पदनिहाय

समावेशन करुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागामार्फत नागरीकांना आपातकालीन परिस्थितीमध्ये तात्काळ रक्तपुरवठा वितरणामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रक्तपेढी विभाग त्यांचे कडील जा. क्र. रक्तपेढी विभाग २६७ दिनांक २३/०३/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २५ / ०४ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ४९,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये २,३४,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |
| २ | गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ३ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ४ | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ११,०००/- | रक्तपेढी विभाग |

तरी रक्तपेढी विभाग यांचे कडील जा. क्र. रक्तपेढी विभाग २६७ दिनांक २३/०३/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन व स्टाफ नर्स या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि.२५/०४/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन व स्टाफ नर्स यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिनयाकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- रक्तपेढी करीता लॅब टेक्नीशियन पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर:- रक्तपेढी करीता लॅब टेक्नीशियन पुर्ननियुक्ती करणे अत्यावश्यक असल्याने.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन व स्टाफ नर्स यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही -

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १७ शनिवार दिनांक ०३/०६/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ** : मोटार व्हेईकल विभाग यांचे कडील जा.क्र. मोटार व्हेईकल विभाग २२७ दि. ३/०३/२०१७ अन्वयेचा अहवाल.

विनंती की, मोटार व्हेईकल विभाग यांनी त्यांचे कडील जा. क्र. मोटार व्हेईकल विभाग २२७ दिनांक ०३ / ०३ / २०१७ अन्वये अहवाल सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मोटार व्हेईकल विभागामध्ये ऑटोमोबाईल इंजिनिअर यांची संदर्भिय क्रं. १ अन्वयेच्या आदेशा नुसार करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात दि. १७/०९/२०१६ पासुन कामावर कार्यरत आहेत. परंतु कंत्राटी करारा नुसार नेमणुक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि. १६/०३/२०१७ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणेकामी खालील नमुद कर्मचारी यांनी दि. ०१/०३/२०१७ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. १) श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार, कनिष्ठ अभियंता , ऑटोमोबाईल २) श्री.जयेश वसंत कोके, कनिष्ठ अभियंता,ऑटोमोबाईल यानुषंगाने मोटार व्हेईकल विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता आहे.सद्यस्थितीत मोटार व्हेईकल विभागाकडे तांत्रिक कर्मचारी (मेकॅनिक) एकच उपलब्ध आहे.परंतु महानगरपालिकेकडे एकुण ८८ वाहने कार्यरत असुन व नविन प्रस्तावित ४० वाहने खरेदी करणेची कार्यवाही चालु आहे. उक्त स्थिती पाहता तांत्रिक कर्मचारी नसल्याने मो.व्हे.विभागास ऑटोबाइल इंजिनिअर यांची आवश्यकता भासत आहे.सदर ऑटो मोबाईल उपलब्ध असल्यास म.न.पा.कडे दैनंदिन वाहन दुरुस्ती बाबतचे कार्यवाही करणे सोईचे होते. या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (ऑटो मोबाईल) पदांवर वरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे संयुक्तीक वाटते."असे नमद करुन सुचित केलेले आहे. श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार,श्री.जयेश वसंत कोके यांचे यापुर्वीच्या दि.०८/०८/२०१६ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदी अटी व शर्ती प्रमाणे श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनेमणूक करणे बाबत पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्कशीट १२१ दि.०७/१०/२०१६ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाच्या मा.स्थायी समिती ठराव ८९ क्रमांक दि.१७/१२/२०१६ अन्वये खालील प्रमाणे नमुद करुन ठराव पारीत करण्यात आलेला होता.

"अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागासाठी तेथील वाहनांची संख्या व कामाची निकड, विभागाची मागणी पहाता करारा नुसार कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदी स्वप्निल बाळकृष्ण पवार व पुर्वी प्रमाणेच मानधनावर कार्यरत असलेले श्री.जयेश कोके यांना सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे,. खर्च मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी." त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८९ दिनांक १७ / १२ / २०१६ अन्वयेच्या नमुद पारीत

ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | सद्यस्थिती मधील सहा महिने पुर्न नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवार स्वप्निल बाळकृष्ण | कनिष्ठ अभियंता (ऑटो.इंजि.) | २०,०००/- | ६७३० १०/०२/२०१७ | १७/०९/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | १७/०९/२०१६ ते १६/०३/२०१७ |
| २ | जयेश वसंत कोके | कनिष्ठ अभियंता (ऑटो.इंजि.) | २०,०००/- | ६७३० १०/०२/२०१७ | १७/०९/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | १७/०९/२०१६ ते १६/०३/२०१७ |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ६७३० दिनांक १० / ०२ / २०१७ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कालावधीतील मुदत ही दिनांक १७ / ०३ / २०१७ पासुन समाप्त झालेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सुधारीत आकृतीबंधामधील यांत्रिकी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या शाखा अभियंता (ॲटोमोबाईल), कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल) यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन तसेच नव्याने पदमंजुर संख्येनुसार पदनिहाय समावेशन करून पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये मोटार व्हेईकल विभागामार्फत वाहनांची वेळेवर दुरुस्ती व देखभाल करणेमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मोटार व्हेईकल विभाग यांचे कडील जा. क्र. मोटार व्हेईकल २२७ दिनांक ०३/०३/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक १९ / ०३ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ४०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पवार स्वप्निल बाळकृष्ण | कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) | २०,०००/- | मोटार व्हेईकल विभाग |
| २ | जयेश वसंत कोके | कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) | २०,०००/ | मोटार व्हेईकल विभाग |

तरी मोटार व्हेईकल विभाग यांचे कडील जा. क्र. मोटार व्हेईकल विभाग २२७ दिनांक ०३ / ०३ / २०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार

तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. १९ / ०३ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर:- कचरा गाडया नादुरूस्त असून पुर्ननियुक्ती करणे अत्यावश्यक असल्याने.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल इंजि.) यापदांवर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका